# SBI PEN. ASSN.'S SAMVAD

स्टेट बँक पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल), पुणे यांची गृहपत्रिका

Price ₹ 3/-

VOL. - 6

ISSUE - 4

OCTOBER - 2013

ऑक्टोबर २०१३

# संवाद

स्टेट बँक ऑफ इंडिया पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल), पुणे

।। स्वयमेव मृगेंद्रता ।।

मनामनांचा मेळ जुळावा । द्वेषाचा लवलेश नसावा ।।
सादासी प्रतिसाद मिळावा । वाद नको संवाद असावा ।।

## दिवाळी विशेषांक



OCTOBER - 2013 SAMVAD

स्टेट बँक कर्मचाऱ्यांच्या अनेक यशस्वी गृहप्रकल्पानंतर

**मेसर्स सुरेश घंगाळे अँड असोसिएट्स्**

**योगेश कन्स्ट्रक्शन्स आणि**

**राजयोग कन्स्ट्रक्शन्स अॅन्ड डेव्हलपर्स**

सादर करीत आहे

## सुसगांव (पाषाण-सुस लिंक रोडवर)

सर्व्हेनं. २१४/३

दोन बेडरूमचे सुसज्ज, अत्याधुनिक फ्लॅटचा प्रोजेक्ट

एरिया ९०० ते १००० स्क्वे. फूट - दर रु.४२००/- प्रति स्क्वे.फूट

बुकींग सुरु

सुरुवातीची रक्कम रु.३ ते ५ लाख - चेक/डी.डी.ने

## ५ गुंठे ते २० गुंठ्याचे फार्महाऊस प्लॉट

(नांव नोंदणी सुरु)

संपर्क

९३७१०१४८०७ / ७५०७८०६००७

<u>ऑफिस</u> -
स.नं.९१/१
स्टेट बँक कॉलनी, रायगड बिल्डींग,
उत्सव हॉल जवळ, पौडरोड,
कोथरूड, पुणे - ४११०३८
वेळ - संध्या. ४ ते ८.००
रविवार व सुट्टीचे दिवस
सकाळी ११ ते १
फोन नं.०२०-२५३८०५०६

<u>ऑफिस</u> -
जी-१५,शांतीकुंज बिल्डींग,
जी.पी.ओ. समोर,
साधु वासवानी रोड, कॅम्प,
पुणे - ४११००१
फोन नं.०२०-२६१२२०२१

# संपादकीय

प्रिय सभासदमित्रांनो,

'संवाद'चा ऑक्टोबर २०१३ चा हा 'दिवाळी विशेषांक' सादर करताना आम्हाला अत्यंत आनंद नि समाधान वाटत आहे. 'संवाद'ने नुकतीच दहा वर्षांची वाटचाल पूर्ण करून दुसऱ्या दशकात पदार्पण केले आहे आणि नव्या आत्मविश्वासाने दमदारपणे तो पुढे जात आहे. 'संवाद' आपल्या शक्तीनुसार प्रारंभापासूनच परमेश्वराच्या रूपात असलेल्या वाचक-सभासदरूपी जनता-जनार्दनाची मनोभावे व निष्ठापूर्वक सेवा (अर्थात पूजा) करीत आहे आणि यापुढेही ती तशीच चालू ठेवण्याचा आमचा संकल्प आहे. 'संवाद'चे स्वरूप अधिकाधिक आकर्षक, वाचनीय, दर्जेदार ठेवण्याचा आणि मनोरंजनाबरोबरच वाचकांचे ज्ञानसंवर्धन होईल असाच आमचा प्रयत्न असतो. आमच्या नवनव्या लेखक-कविमित्रांच्या सहकार्यामुळे आम्ही यामध्ये यशस्वी होतो. त्यामुळेच दर महिन्याला आमचे सभासद मित्र 'संवाद'ची चातकाप्रमाणे वाट पाहात असतात आणि 'संवाद' मिळण्यास जरा जरी विलंब झाला तरी त्याविषयी चौकशी करणारे अनेक दूरध्वनी आमच्याकडे येऊ लागतात. अर्थातच 'संवाद'चे सर्व अंक टपालातून एकाच दिवशी रवाना होत असले तरी टपालाच्या दिरंगाई कारभारामुळे काही सभासदांना ते मिळण्यास विलंब लागतो. पण 'संवाद' वेळेवर न मिळाल्यामुळे अस्वस्थ वा बेचैन झालेल्या सभासदांचे येणारे दूरध्वनी म्हणजे 'संवाद'च्या वाढत्या लोकप्रियतेचे गमक होय. 'संवाद'ने स्वत:ची एक दर्जेदार नि प्रतिष्ठित प्रतिमा नि परंपरा वाचकांच्या हृदयात निर्माण केलेली आहे. ही वस्तुस्थिती आहे आणि आम्हाला या गोष्टीचा नितांत अभिमान वाटतो. 'संवाद'च्या या प्रतिमेचं नि परंपरेचं प्रतिबिंब 'संवाद'च्या ह्या दिवाळी विशेषांकातही पडल्याचे वाचकांना दिसेल. दिवाळीतील रुचकर नि चविष्ट पदार्थांप्रमाणेच 'संवाद'च्या ह्या विशेषांकातील साहित्यिक फराळ वाचकांची बौद्धिक भूक भागविणारा ठरेल असा विश्वास वाटतो. पणतीतील ज्योत आपल्या शक्तीनुसार अंधारमय सभोवताल उजळून टाकते अन् अंधाराचा नाश करते. ज्ञानरूपी प्रकाश अज्ञानरूपी अंधार नष्ट करतो म्हणूनच तर आपण 'प्रज्वालितो ज्ञानमय: प्रदीप:' हे वचन शिरोधार्य मानतो. सुखाची लकेर दु:खाला आवर घालते. आशेचा एखादा किरणही निराशेला दूर पळवून लावतो. सकारात्मक विचार माणसाला नकारात्मक विचारांच्या दरीतून बाहेर काढतात नि योग्य मार्गावर आणून सोडतात. विवेकी अन् विचारी मन माणसाला विकारवश होण्यापासून परावृत्त करते व सन्मार्ग दाखविते -आसुरी शक्तींवर मात करून त्या नष्ट करण्यासाठी आपण दैवी शक्तींची आराधना करतो. आपला 'संवाद' देखील दिव्याच्या किंवा पणतीच्या ज्योतीतील प्रकाश बनण्याचा आणि सुखाचा, आशेचा, सकारात्मक विचारांचा, विवेकी वृत्तीचा, दैवी शक्तीचा दूत बनण्याचा आपल्या शक्तीनुसार निश्चयपूर्वक प्रयत्न करील. मात्र त्यासाठी आपणा सर्वांचे पाठबळ आणि आशीर्वाद आम्हाला हवेत.

ही दीपावली व नूतन वर्ष आमच्या सर्व सभासदांना, त्यांच्या कुटुंबीयांना, लेखक-कवी-चित्रकार व हितचिंतक या सर्वांना सुखाचे, समृद्धीचे व समाधानाचे जावो आणि दिवाळीच्या प्रकाशात सर्वांचे जीवन सर्वार्थाने उजळून जावो ही दीपावलीनिमित्त शुभेच्छा!

- **क्रांतिसेन रामचंद्र आठवले,**

भ्रमणध्वनी - ९८६९९४१६९१

## अमरावती झोनल सब-सेंटर

अमरावती झोनल सब-सेंटरच्या प्रभारी कार्यकारिणीस कळविण्यास अतिशय आनंद होत आहे की आपल्या असोसिएशनच्या नवनिर्मित अमरावती झोनल सब-सेंटरच्या उद्घाटनाचा आणि झोनल सब-सेंटरच्या प्रभारी कार्यकारिणीच्या पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण समारंभ अमरावती मुख्य शाखेच्या सभागृहात रविवार दि.४ ऑगस्ट २०१३ रोजी सकाळी ११ वाजता अतिशय उत्साहात व आनंदी वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान अमरावती युनिटचे ज्येष्ठ सदस्य श्री.पुरुषोत्तम शर्मा यांनी भूषविले होते. तसेच नागपूर झोनल सब-सेंटरचे माजी-अध्यक्ष मा.श्री.श्रीकांत देसाई उद्घाटक म्हणून लाभले होते.

सर्वप्रथम प्रमुख पाहुण्यांचे हस्ते सरस्वती पूजन व दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर श्री.शर्मा व श्री.देसाई यांचे शुभहस्ते **'स्टेट बँक ऑफ इंडिया पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल) पुणे - अमरावती झोनल सब-सेंटर, अमरावती'** ह्या नामफलकाचे अनावरण झाले आणि नंतर श्री.देसाई साहेबांनी अमरावती झोनल सब-सेंटरचे उद्घाटन झाल्याचे जाहीर करून नवनिर्मित झोनल सब-सेंटरच्या प्रभारी कार्यकारिणीची (Ad-hock Committee) नावे सभागृहास वाचून दाखविली.

### प्रभारी कार्यकारिणी

| | | |
|---|---|---|
| श्री.अविनाश निमदेव (अमरावती) | - | अध्यक्ष |
| श्री.मोहनसिंग मुणोत (खामगांव) | - | उपाध्यक्ष |
| श्री.ज्ञानप्रकाश खोब्रागडे (अमरावती) | - | सचिव |
| श्री.गोपाळकृष्ण गाडगे (यवतमाळ) | - | सहसचिव |
| श्री.विनायक जळीत (अमरावती) | - | कोषाध्यक्ष |
| श्री.नीळकंठ नागराज (अकोला) | - | कमिटी मेंबर |

सर्वप्रथम श्री.निमदेव यांनी अमरावती झोनल सब सेंटरच्या निर्मितीची पार्श्वभूमी सांगितली. बँकेने अमरावती झोनल ऑफिसची १ एप्रिल २०१३ रोजी स्थापना करून अमरावती, अकोला, बुलढाणा (खामगाव), यवतमाळ व वाशिम या पाच जिल्ह्यातील ब्रँचेस्चा कंट्रोल अमरावती झोनल ऑफिसकडे वर्ग केला. तसेच अमरावती येथील प्रस्तावित जागेचा ताबा मिळेपर्यंत सध्यातरी नागपूर येथील झोनल ऑफिसच्या जागेमधूनच नवीन झोनल ऑफिसचे कामकाज सुरु केले आहे. त्यामुळे वरील पाचही जिल्ह्यातील असोसिएशनच्या सभासदांच्या मागणीनुसार (सध्याची सभासद संख्या ९५०+ आहे) त्यांच्या सोयीसाठी अमरावती झोनल सब-सेंटरची स्थापना करण्याचा निर्णय घेण्यात आला व सर्कल असोसिएशनने असोसिएशनच्या उपविधीनुसार त्यास मान्यता दिली. वरील अस्थायी कमिटीने लवकरच रीतसर निवडणूका घेऊन कार्यभार नवनिर्वाचित कार्यकारिणीकडे सोपवावा असे ठरले.

सभेचे अध्यक्ष श्री.शर्मा यांनी आपल्या समयोचित भाषणात विद्यमान पदाधिकाऱ्यांच्या उत्साहवर्धक कार्याची दखल घेऊन त्यांची प्रशंसा केली व त्यांच्यावर आलेल्या नवीन जबाबदारीची जाणीव करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. त्यानंतर श्री.नीळकंठ नागराज यांनी आपल्या भाषणात सांगितले की बँकेने विदर्भातील बँकेच्या विस्तारित कामाची दखल घेऊन दोन स्वतंत्र प्रशासकीय विभाग केले. त्यानुसार आपल्या असोसिएशननेसुद्धा सभासदांच्या समस्यांचे निराकरण त्वरित होण्यासाठी अमरावती झोनल सब्-सेंटरची निर्मिती करून सकारात्मक पाऊल उचलल्याबद्दल समाधान व्यक्त केले.

याप्रसंगी श्री.मुणोत व श्री.गाडगे यांनीही सभेला संबोधित केले. श्री.मुणोत यांनी अमरावती झोनल सब्-सेंटरच्या उद्घाटनाबद्दल समाधान व्यक्त केले. श्री.गाडगे यांनी आपल्या भाषणात अमरावती झोनल सब्-सेंटरची स्थापना म्हणजे प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध बंडखोरी नसून, बँकेच्या स्तरावर होत असलेल्या घडामोडींचा सर्वंकष विचार करून व अमरावती झोनल ऑफिसच्या कार्यक्षेत्रातील सभासदांच्या सोईचा विचार करूनच अमरावती झोनल सब्-सेंटरची स्थापना करण्यात आली असल्याचे सांगितले. या कार्यक्रमास श्री.जयंत वकील व श्री.अवधूत रोटकर हे आवर्जून उपस्थित होते व त्यांनी अमरावती झोनल सब्-सेंटरला शुभेच्छा दिल्या. अमरावती युनिटचे सचिव श्री.मुकुंद जोशी यांनी आपल्या भाषणात अमरावती येथील कार्यकर्त्यांवर पडलेल्या नवीन जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडण्यासाठी सर्वतोपरी कार्यरत राहण्याची हमी दिली.

श्री.श्रीकांत देसाई यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात अमरावती झोनल सब्-सेंटरची स्थापना म्हणजे नवी जबाबदारी असून बँकेच्या झोनल ऑफिसशी योग्य सुसंवाद ठेऊन सभासदांच्या समस्या सोडविण्यावर लक्ष केंद्रित करावयाचा सल्ला दिला. तसेच सभासद-फी द्वारे मिळणाऱ्या मोजक्या उत्पन्नावर व सभासदांनी दिलेल्या ऐच्छिक देणगीवरच झोनल सब्-सेंटरला आर्थिक पाठबळ मिळत असते. त्यामुळे जास्तीत जास्त सभासद नोंदणी व अधिक देणग्या गोळा करण्यावर सर्वांनी भर देणे आवश्यक असल्याचे नमूद केले. शेवटी त्यांनी अमरावती झोनल सब्-सेंटरला सुयश चिंतले.

शेवटी श्री.खोब्रागडे यांनी आपल्या समारोपाच्या भाषणात अमरावती झोनल सब्-सेंटरच्या स्थापनेसाठी ज्यांनी ज्यांनी मदत केली, प्रोत्साहन/मार्गदर्शन केले त्या सर्वांचे आभार मानले व तसे ते यापुढेही मिळत राहील अशी अपेक्षा व्यक्त केली. त्यानंतर अल्पोपहार व चहापान होऊन कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.श्याम कुऱ्हेकर यांनी अत्यंत रसाळ व ओघवत्या भाषेत, निवडक व चपखल अशा अवतरणे व अभंग-ओव्यांसहित केले. त्याला सर्वांनी चांगली दाद दिली.

**ज्ञानप्रकाश खोब्रागडे**
सचिव, प्रभारी कमिटी, अमरावती झोनल सब्-सेंटर
(Mobile No.09372034464)

## STATE BANK OF INDIA PENTIONERS' ASSOCIATION (MUMBAI CIRCLE), PUNE
## MUMBAI ZONAL SUB-CENTRE

### Minutes of the 26th Annual General Meeting held at Shivaji Mandir Natyagruh, Dadar, Mumbai on Friday the 8th Ferubary 2013

The meeting began at 11.30 a.m as scheduled. This meeting was also celebrating Silver Jubilee function of Mumbai Zonal Sub-Centre. Shri.P.A.Lopes extended warm welcome to all pensioner members / associate members and family pensioner members. He wished all a happy and peaceful life and good health throughout the year. He also gave best wishes to all the students of 10th and 12th std examination which was to begin at the end of month.

Thereafter, Shri.Lopes, Regional Secretary, invited on the dais Shri.B.G.Dandekar, former Adviser to the Federation, Shri.V.M.Gokhale, President of the Circle Association and Shri.S.B.Gokhale, President of Mumbai Zonal Sub-Centre and requested them to occupy the chairs.

Shri.Lopes read out the messages received from the following dignitaries giving Best wishes to this Annual General Meeting of Mumbai Zonal Sub-centre.

1) Dr.J.N.Misra, Chief General Manager of Mumbai Circle,
2) Shri.P.P.S.Murthy, General Secretary of Federation of SBI Pensioners' Associations,
3) Shri N.K.Jain, President, S.B.I.Pensioners' Association, Bhopal Circle.

Shri.Lopes then requested Smt.Charulata Save and her team, who are members of our Dahisar unit, to sing 'Sarswati-Vandana' and 'Ganesh Vandana'.

Shri.S.B.Gokhale, President, took over the charge and began the proceedings as per the agenda published in 'Samvad' for the month of January 2013.

**Agenda Item No.1 : To condole the death of pensioners / associate members & family pensioners whose names have been reported to us from 21.03.2012 to 08.02.2013** - Shri.S.B.Gokhale requested the gathering to stand in silence for 2 minutes to pay homage to the departed souls. All stood in silence to pay homage.

**Agenda Item No.2 : To confirm the minutes of Annual General Meeting held on 21.03.2012 -** The minutes were confirmed by clapping the hands by all the present.

At this juncture the Bank's Pensioners' meet started, as the dignitaries from the Bank arrived. Shri.Pradeep Thakare, AGM(PPFG), Shri.Upasani, Shri.Muley, Dr. Ajinkya, Chief Medical Officer, Dr.Padhye, Senior Medical Officer. The Bank's dignitaries were honoured with a boquet by Shri.S.B.Gokhale, President, SBIPA Mumbai ZSC.

In his address Shri.S.B.Gokhale emphasized the need of Bank Dispenseries at Goregaon and Vasai & also the problems of the family pensioners after demise of their spouse in getting the family pension.

Shri.Muley, an officer from LHO, presented a slide show regarding How to access Bank's Pensioner portal and furnish Investment details as also how to get pension slip from the pension-paying branches etc. The slide show was presented in a very effective manner the details of which were published in Samvad issue of February 2013 on page 8 to 11. All are requested to go through it and solve their problems. After Bank's Meet a lunch break was taken. After the lunch break, the Association meeting started.

**Agenda Item No.4 :** Managing Committee's Report for 2012 was put up before the meeting for discussion by Shri.S.B.Gokhale which was adopted unanimously in the meeting.

नोव्हेंबर महिन्यात बँकेत जाऊन लाइफ सर्टिफिकेट द्यावे

Thereafter Shri.V.M.Gokhale, Circle President, spoke on the occasion. He told the house regarding court cases pending in various High Courts. Members listened carefully and patiently.

After President's speech, the senior members who completed 75 years of age during the period from 22.03.2012 to 08.02.2013 were honoured at the hands of the President.

Then Shri.V.M.Gokhale, Circle President, honoured the office-bearers who have devoted their valuable time for Association work during the last 25 years. The report has already been published in Samvad issue of February 2013 on pages 4 to 7.

Shri.J.B.Pusalkar read out the names who have given donations on this occasion and thanked all of them. The total Donations collected on the day are Rs.98500/-. Around 1100 pensioners, associate members & family pensioners attended the AGM and Silver Jubilee function.

The Meeting concluded after 'Pasaydan'. The Vote of Thanks were given by Shri.S.W.Agarkar to all the pensioners, associates, family pensioners who attended the meeting. He also thanked the Trustees of Shivaji Mandir and other staff who have helped to make this meeting a grand success.

**Subhash Agarkar**
Organizing Secretary, Mumbai ZSC

*****************************************************************************************

व्यक्तिविशेष

## श्वेता गानू - एक प्रसन्न व्यक्तिमत्त्व

२००१ साली मांडवी (मुंबई) ब्रँच मधून VRS घेतलेल्या श्वेता गानू हे एक प्रसन्न व्यक्तिमत्व. सदैव कामात रमणाऱ्या, नवीन करण्याची उर्मी जपणाऱ्या. त्यांच्या मुलांनी उच्च शिक्षण घेऊन आप-आपले मार्ग निवडले. स्वाभाविकच संसारात मानसिक व आर्थिक स्थैर्य प्राप्त झाले. काही नवीन वाट चोखाळायची असा विचार पक्का करूनच त्यांनी VRS घेतली. नाती बरोबर जीवनाचा श्रीगणेशा गिरवण्याची ओढ होती. सातच्या आत घरी परतून, आपलं कुटुंब हसतं-खेळतं ठेऊनच स्वत:चा छंद जोपासण्याची कल्पना मनी बाळगली व त्यात त्या यशस्वी झाल्या.

बँकेत असतांनाच 'आकाशवाणी'वर त्यांचं 'कथाकथन' रंगलं होतं. 'वनिता मंडळ' तसेच 'सहज सुचलं म्हणून' या मुंबई आकाशवाणीवरील कार्यक्रमाचे लेखन करून, प्रसंगी त्यात सहभागही घेतला होता. साहित्याची, लेखनाची आवड त्यांना बालपणापासूनच होती. नवलेखक अनुदान योजनेतून 'मुग्धा' हा मासिकांतून प्रकाशित झालेल्या त्यांच्या कथांचा संग्रह त्या बँकेत असतांनाच प्रकाशित झाला होता. काल्पनिक कथा रंगवण्यापेक्षा उद्योजकांच्या 'यशोगाथा' चित्रित करण्याची कल्पना त्यांना अधिक भावली. 'स्वयंप्रज्ञेचा शोध', 'स्वप्नांना ओढ समृद्धीची'(२० उद्योजकांच्या चरित्रगाथा), 'ध्यास ध्येयपूर्तीचा'(श्री.वामनराव प्रभूदेसाई), 'सायकल ते BMW' (श्री.प्रकाश पाटील), अशा दिग्गज उद्योजकांच्या आयुष्यगाथा त्यांनी शब्दांकित केल्या आहेत. त्यांच्या पुस्तकांचा भव्य प्रकाशन सोहळाही संपन्न झाला तो मा.सुशिलकुमार शिंदे, मा.पृथ्वीराज चव्हाण, मा.नितीन गडकरी, मा.मनोहर जोशी, मा.मनोहर पर्रीकर, मा.एकनाथ ठाकूर, मा.स्नेहलता देशमुख अशा थोरामोठ्यांचे हस्ते. त्यांच्या नावावर दर्जेदार अशी तब्बल १८ पुस्तके फार कमी वेळात नोंदवली गेली आहेत. साहित्याच्या विविध प्रकारच्या आवडीतून दिवाळी अंकांची कल्पना साकारली. लिहिणाऱ्यांना लिहितं करावं या भावनेतून गेली सहा वर्षे त्या 'सुश्रेय' नावाचा दिवाळी अंक काढीत आहेत. तसेच विविध विषयांची माहिती असलेली डायरी दरवर्षी एप्रिलमध्ये आपल्याला पहायला मिळते. करणाऱ्याला कांहींही अशक्य नाही असे त्यांचे सांगणे असते. अशा या चतुरस्त्र व्यक्तिमत्वाला माझा सलाम !

**वसुधा भालचंद्र खरे, ठाणे**
फोन नं.०२२-२५४२१७१९

******************

## Congratulations

Dr.Mitali Wadekar Sharma, daughter of Mrs.Deepa D.Wadekar, our member from Goregaon (Mumbai), has done 'Doctor of Medicine' (M.D.) in Psychiatry from University of California, Los Angeles (USA) and also has done Super Specialisation in Adult, Child & Adolescent Psychiatry. She has recently started her clinic in Los Angeles.

Congratulations Dr.Mitali. On behlaf of our Association we wish her bright success in her future !!

- Secretary

****************************

## State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle) Pune
### NAGPUR ZONAL SUB-CENTRE

C/o Sudhir Agrekar
17-A Mahavir Nagar,
P.O. - Hanuman Nagar,
Nagpur - 440009
Dated : 11th October 2013

To,
All the Members

Dear Comrades,

### ANNUAL GENERAL MEETING OF NAGPUR ZONAL SUB-CENTRE

It has been decided to hold the Annual General Meeting of **Nagpur Zonal Sub Centre** on Sunday, the **24th November, 2013** at 11.00 A.M. at Ground Floor Parking, State Bank of India, Zonal Office, Kingsway, Nagpur to discuss the following issues :

1. To condole the deaths of the members died after last Annual General Meeting on 16th Sept. 2012.
2. To confirm the minutes of last Annual General Meeting dated 16/9/2013.
3. Report of Secretary, Nagpur Zonal Sub-Centre.
4. To felicitate the Senior members who have completed age of 75 years. (Separate invitations will be sent to all such members.
5. Latest developments at the Association front.
6. Any other matter with the permission of chair.

Please note that **Bank's PENSIONERS' MEET for Nagpur Zonal Office, Zone 1**, has been arranged on the same date.

Breakfast will be provided between 9.30 to 10.30 A.M. Lunch will be provided during 1.00 to 2.00 pm

All the members are requested to please attend in time.

Sudhir Agrekar
Secretary

*****************************************************************************

### अभिनंदनीय

आपले सांगली येथील सभासद श्री.रघुनाथ रामचंद्र कुंडले यांच्या पत्नि सौ.अंजना कुंडले या सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिकेच्या निवडणुकीत नगरसेविका म्हणून निवडून आल्या. त्याबद्दल त्यांचे असोसिएशनतर्फे हार्दिक अभिनंदन !

तसेच इस्लामपूर (जिल्हा-सांगली येथील फॅमिली पेन्शनर श्रीमती पुष्पा सहदेव शेटे यांचे चिरंजीव मोतीलाल सहदेव शेटे हे 'भारतीय प्रशासनिक सेवा' (I.A.S.) जून २०१३ च्या परीक्षेत उत्तमरित्या उत्तीर्ण झाले आहेत. त्याबद्दल त्यांचे असोसिएशनतर्फे हार्दिक अभिनंदन व पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा !

- सेक्रेटरी

महापालिकेच्या निवडणुकीत एक उमेदवार एका घरी प्रचाराला जातो. ''आपल्या घरातील सर्व पाच मते मलाच मिळतील, अशी मी आशा करायला हरकत नाही ना?

मतदार - माफ करा मी आधीच एका उमेदवाराला वचन दिले आहे, की आमची सर्व मते आम्ही त्यालाच देऊ.

उमेदवार - अहो, निवडणुकीत दिलेले वचन पाळलेच पाहिजे असे काही बंधन नसते.

मतदार - तसे असेल तर मीही तुम्हाला वचन देतो.

- **वसंत धुपकर,** पुणे
०२०-२०२५५४०८

**Furnish Life Certificate to the Bank during November**

## Resolution passed by the General Body of our Federation at its Annual General Meeting held on 11th August 2013 at New Delhi

We furnish hereunder the Resolution which contains our various demands covering various common issues for the information of our members.

The Annual General Body of our Federation resolved to appeal to the Corporate Centre of our Bank to consider our following requests favourably.

i) To arrange for extension of the benefit of updation of pension on every revision of salary on the same basis as is done by the Central Government to its employees.

ii) To arrange for the revision of the family pension at 30% of pay to all.

iii) To arrange for payment of improved pension and family pension to all those aged 80 and above on the same basis as paid by the Government.

iv) Pending the revision of family pension at 30% of pay to all, to arrange for the revision of family pension of pensioners retired between 1-11-1987 and 1-11-1992/1-07-1993 on the basis of revision of family pension made in January 2008 with suitable increase in minimum family pension now being paid on the Fourth Bipartite Pay scales.

v) To arrange for applying the same formula adopted under the Industry Level Pension Scheme for the commutation under our Pension Scheme.

vi) To arrange for payment of enhanced gratuity up to Rs.10 lacs to all those retired from 1-1-2006 to 23-05-2010 by sustained follow-up with the Government.

vii) To arrange for revising minimum pension corresponding to the revision made on the basis of industry level pension settlement.

viii) To modify the Retired Employees Medical Benefit Scheme-II by

(a) enlarging the eligible diseases to cover all ailments, in particular Gynaecologic Diseases, Hysterectomy, Asthama, ENT, Neurological disorders requiring hospitalization

(b) extending the coverage of the recently improved Medical Benefit Scheme to all those retired before attaining the age of 60 years, including the VRS and Exit option retirees with a stipulation to avail of the benefits on attaining the age of 60 years.

(c) extending the coverage of 20 ailments to the members of Scheme-I and II with domiciliary facility

(d) making all members of REMBS-I eligible for admission to improved REMBS-II

(e) extending the benefits of the REMB Scheme to the disabled children, widowed daughters and dependent parents

(f) providing for the hospitalization treatment including the domiciliary facility for the treatment of all terminal illness

(g) making the Scheme eligible for admission of the family pensioners by accepting applications from them, after the death of their spouses, while in service or after retirement

(h) to consider making improvements in the REMBS for providing the maximum cover of Rs.20 lacs to all cadres of pensioners willing to pay the contribution and increasing the domiciliary facility from 10% to 20%

(i) to delegate the authority for approving the hospitals and dispensaries as per the norms stipulated by the Bank to LHOs with adequate mechanism for monitoring the proper

functioning of the dispensaries and by ensuring availability of funds with timely and adequate allocation of funds necessary for prompt payment of bills under REMBS,

(j) to arrange for publication in vernacular languages the payment of family pension by our Bank to the spouses of the deceased ex-servicemen employees in addition to the family pension from the Government and also to the spouses of the employees of our Bank, who died in harness, while in service,

ix) To provide one more opportunity to the VRS / Exit option Retirees, who have not paid the arrears of subscription to MWF up to 60 years of age within six months from the date of retirement and make them eligible for availing of the benefits of the Scheme on attaining the age of 60 years,

x) To arrange for extending the benefits of Judgments of the various Courts already implemented by our Bank to all other pensioners similarly placed.

xi) To recognize the Federation and Associations of Pensioners and provide office accommodation and other facilities to our Federation and its Affiliates in all Circles to enable them to provide the various services required by past employment of our Bank,

xii) To restore the concession of the additional interest at 0.50% p.a., on the deposits of senior citizens,

xiii) To provide the overdraft facility exceeding Rs.3 lacs granted to the pensioners of our Bank against their term deposits at the same rate paid by the Bank on their deposits, as charged for overdraft less than Rs.3 lacs.

xiv) To arrange for providing the concessionary facilities including interest on secured advances like gold loan being extended to the serving staff by our Bank, to pensioners and family pensioners by the Bank by making suitable changes in its Core Banking software packages.

xv) To arrange for providing locker facilities to pensioners and family pensioners of our Bank with same terms without any limit on the number of operations as provided to the serving staff.

xvi) To arrange to extend the facility of interest free festival advance provided to the serving employees to the pensioners of our Bank to enable them to meet the expenses for celebrating the festivals.

xvii) To provide the same concessionary rate of interest at a 8.00% p.a. on the educational loans granted to the children of employees while in service, after their retirement also instead of the rate applicable to public.

xviii) To arrange for establishing its dispensaries at all eligible centres and District head quarters with adequate stock of standard medicines, for meeting the requirements for this purpose and to adopt a uniform procedure for the selection by the appointment of committee consisting of the Bank's Chief Medical Officer (Not Civil Surgeon) and one or two Officials of the Bank and appointment of Doctors at the dispensaries,

xix) To arrange for the review of REMBS of e-SBS and e-State Ban of Indore and provide for the same medical facilities provided by State Bank of India to the pensioners of e-SBS and e-State Bank of Indore,

xx) To arrange for providing one more option to the VRS Retirees of e-SBS and e-SB of Indore for joining the Pension Scheme

xxi) To arrange for the merger of data by CSPPC relating to the pensioners of e-SBS and e-SB of Indore after due verification of the accuracy of the data.

# युनिट वार्ता

## सांगली युनिट :

सांगली युनिटची १३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा ७ ऑगस्ट २०१३ रोजी सांगली येथील दांडेकर हॉल येथे संपन्न झाली. सभेस ११७ सभासद/सहसभासद उपस्थित होते. सभेचे सूत्रसंचालन श्री.अनिल ताम्हनकर यांनी केले. सुरुवातीस युनिटचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सचिव यांच्या हस्ते गणेश पूजन व दीप प्रज्वलन होऊन सभेस सुरुवात झाली.

त्यानंतर गतवर्षात दिवंगत झालेले पुढील सभासद - सर्वश्री एल्.डी.चौगुले, बा.शं.बोरगावकर, ज.रा.पोळ, व.शं.अहिवळे, सौ.निर्मला बा.भोसले, सौ.मेधा मु.जोगळेकर, सौ.सुमन दे.नाईक, श्रीमती सविता सु.प्रभुणे तसेच संवाद मासिकाच्या संपादक मंडळापैकी श्री.श्रीधर सहस्रबुद्धे या सर्वांच्या निधनाबद्दल श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर वर्षभरातील नव्याने नोंद झालेले सभासद व सहसभासद यांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. त्यानंतर युनिट सहसचिव श्री.सुरेश छत्रे यांनी पेन्शन संबंधात घ्यावयाच्या काळजीविषयीच्या सूचनांची संकलित केलेली माहिती श्री.ताम्हनकर यांनी वाचून दाखवली.

नंतर सचिव श्री.करमरकर यांनी युनिटचा गतवर्षीच्या आमसभेचे इतिवृत्त वाचून त्यास सभेची मान्यता घेतली. त्यानंतर त्यांनी युनिटचा २०१२-१३ चा वार्षिक अहवाल वाचला. त्यात त्यांनी सांगितले की सांगली युनिटचे - पेन्शनर सभासद १८८, सहसभासद १७४ व फॅमिली पेन्शनर सभासद २६ असे एकूण ३८८ सभासद आहेत. अजून अनेक पेन्शनर्स हे असोसिएशनचे सभासद व्हायचे राहिले आहेत. त्यांना सभासद करून घेण्यासाठी सर्व सभासदांनी प्रयत्न करावयास हवेत असे आवाहन केले. तसेच युनिटला वेगवेगळे कार्यक्रम आयोजित करण्यासाठी आर्थिक पाठबळाची आवश्यकता आहे. तरी त्यासाठी प्रत्येक सभासदाने वर्षात कमित कमी रुपये १००/- देणगीदाखल द्यावेत असे आवाहन केले.

युनिटचे चार पेन्शनर सभासद गेल्या वर्षभरात दिवंगत झाले असून, त्यांचे फॅमिली पेन्शन मंजूर असूनसुद्धा ६ महिने झाले तरी अजून फॅमिली पेन्शन जमा होत नाही याबद्दल नाराजी व्यक्त करून, त्यासबंधी योग्य ती कार्यवाही असोसिएशनने करावी जेणे करून पेन्शनरच्या मृत्युनंतर एक-दोन महिन्यातच फॅमिली पेन्शन सुरु व्हावे अशी अपेक्षा व्यक्त केली.

युनिटच्या इस्लामपूर येथील सभासद श्रीमती पुष्पा शेटे यांचे चिरंजीव मोतीलाल शेटे हे आय.ए.एस्. परिक्षा उत्तीर्ण झाले त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले. तसेच सांगली येथील सभासद श्री.रघुनाथ रा.कुंडले यांच्या पत्नि व सहसभासद सौ.अंजनाताई या सांगली-कुपवाड-मिरज महानगरपालिकेत नगरसेविका म्हणून मोठ्या मताधिक्याने निवडून आल्या त्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन करण्यात आले. याप्रसंगी श्री.रा.र.कुंडले यांनी आपले मनोगत व्यक्त करून असोसिएशनचे आभार मानले.

युनिटचे सहसचिव श्री.माणगावकर यांच्या गांवभाग ज्येष्ठ नागरीक संघातील कार्याबद्दल व त्यांच्या संस्कृत वाङ्मयाच्या व्यासंगाबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले. तसेच दुसरे सहसचिव श्री.सुरेश छत्रे यांचे याही वयात ते करीत असलेल्या गिरिभ्रमणाबद्दल अभिनंदन करण्यात आले. त्यांनी आपल्या युनिटच्या सांस्कृतिक व अन्य कार्यक्रमात त्यांच्या या गुणांचा उपयोग करावा असे आवाहन करण्यात आले. सांगली येथे बँकेची डिस्पेन्सरी चालू करावयासाठीचे प्रपोजल झोनल ऑफिसकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठविल्याबद्दल सांगली शाखेचे व्यवस्थापक श्री.दिलीप जोशी यांचे आभार मानून लवकरच सर्व पेन्शनर्सच्या सोयीसाठी ही डिस्पेन्सरी चालू होईल अशी अपेक्षा सचिव श्री.करमरकर यांनी व्यक्त केली. नंतर त्यांनी सर्व पदाधिकाऱ्यांनी व सभासदांनी दिलेल्या सहकार्याबद्दल सर्वांचे आभार मानले. यानंतर खजिनदार सौ.कवठेकर यांनी युनिटचा २०१२-१३ या वर्षाचा जमा-खर्च व ताळेबंद सभेपुढे मांडून त्यास मंजुरी घेतली. शुभसंदेशांचे वाचनानंतर सांगली येथील सभासद श्री.सांगवडेकर व श्री. माळगे यांच्या आपल्या प्रलंबित मागण्यांच्या संदर्भातील विविध कोर्टात चालू असलेल्या केसेसच्या अभ्यासाबद्दल व त्याविषयीच्या संबंधितांना ते करीत असलेल्या उपयुक्त सूचनांबद्दल त्यांचे तसेच याबाबत त्यांना सहाय्य करीत असलेले श्री.करमरकरजी व श्री.मेहता यांचेही अभिनंदन केले. त्यानंतर श्री.माळगे यांनी निरनिराळ्या कोर्ट केसेस संबधी माहिती सभासदांना दिली. सर्वश्री करमरकरजी, मेहता व अनिल ताम्हनकर यांनीही समयोचित भाषणे करून पेन्शनसंदर्भात व बँकेच्या मेडिकल स्कीमस् संबंधी सुधारणा करण्यासंदर्भात आपले विचार प्रदर्शित केले. या संबंधीचे ठराव सभेत पारित करण्यात आले.

अध्यक्षीय भाषणात श्री.एस.एस.कुलकर्णी यांनी सर्व वक्त्यांच्या भाषणांचा परामर्ष घेऊन युनिटने केलेल्या कामाबद्दल समाधान व्यक्त केले व सर्व सभासदांनी कार्यात सहभागी व्हावे व युनिटला आर्थिक पाठबळ द्यावे असे आवाहन केले. शेवटी श्री.छत्रे यांनी सर्वांचे आभार मानल्यावर भोजनोत्तर सभेची सांगता झाली.

**- स.दि.करमरकर, सचिव(सांगली युनिट)**

## पत्नी

जेव्हा पत्नी तुमच्याशी हळू आवाजात बोलते तेव्हा तिला तुमच्या कडून काहीतरी हवे असते. जेव्हा पत्नी तुमच्याशी मोठ्या आवाजात बोलते तेव्हा तिला तुमच्याकडून हवे ते मिळालेले नसते. जेव्हा पत्नी रडायला सुरुवात करते, तेव्हा तिला खात्री असते कि तिला हवे ते ती मिळविणारच असते.

☺☺☺ **- वसंत धुपकर,** पुणे

०२०-२०२५५४०८

# GOOD AND EVIL COEXIST

In childhood after witnessing death of grandfather and others amongst relatives and friends, I felt that there should not be any death at all. Logically then there should not be any birth as well. But this emotional childhood feeling is not possible; children youngsters and old persons would have to remain as they are which is not possible. Estimated two billion people are killed by bacteria every hundred years. But, if there were no deaths the chaos of over population is unthinkable!. "Since life is inherently a medley of good and evil, of beautiful dreams and nightmares, we should seek out and help to create beautiful dreams and not get caught up in the frightful nightmares."

**Why Evil is Necessary**

We need light and shadows to see a picture. If movie producer makes motion pictures of angels, virtuous men and heroes, he will have to close the business. Thus we need both good and evil to coexist in life. We can not write with white chalk unless there is a black board. Contrast of evil is needed to enable us to recognize and appreciate good.

Ravan, the King of Lanka, was necessary as a villain to make Sita famous. The story is not a fiction. There is Ashok Vatika in Sri Lanka and Sita's idol is there in the vatika. Evil act of Judas made Jesus Christ eternally famous. Triumph of Christ over evil became famous due to evil act of Judas.

In other words, evil is necessary and only good acts will not be effective without it. God does not use evil to destroy us. "The truth is that God is using evil not to destroy us but to make us disillusioned with His toys, with the play things of this world, so that we might seek Him ."God has every thing except our love. Evil is used by God to attract us to Him by making us strong, while facing evil.

Misery is essential to enable us to turn to God. He wants us to be detached to good and bad and only to remain observers in the drama of his creation. which has good and evil as a necessity of existence. God has given us powers to be good but we have to choose to use that power. When God is realized there is no evil to God realized persons. Every time we feel limitations, if we close eyes and say to ourselves, "I am the infinite" we can realize what powers we have acquired. This is an effect of affirmation.

**Emotional Sensitivity**

Although we are not aware, emotional sensitivity is the cause of all suffering. It is a constant danger to our happiness. Unless we keep our mind anchored in God, our suffering will create a problem. It is necessary to look inward and identify ourselves with soul i.e. God. When we do our actions we have to do these for God remembering Him always. When that is done even without any other spiritual technique the mind remains anchored in God. We have to remember that God has give us a role and unless we play that as intended by Him as sincerely as possible, we cannot get rid of emotional sensitivities. Spiritual techniques enable us to have God consciousness. If we do work and spiritual technique to connect body, mind and soul in a balanced manner emotional sensitivities will disappear and consequently there will be no suffering.

**Look Within for Happiness**

Even evil person does not want to suffer from his actions. In fact, he expects to derive good from his actions. Good and evil people seek happiness in their own way. Evil people expect this due to ignorance; these people seek happiness in outer things. Anyone who seeks real long term happiness is seeking God. The real happiness will come when it is found within. and not from outer achievements or possessions. God wants us to forget everything and seek him only.

It appears that God created imperfect beings from his perfection. In fact, even imperfect beings also have soul which is perfect. God wants us to separate our dream imperfections from the perfect souls made in God's image and identify ourselves with the soul within and not with body. When

we forget the soul within we consider ourselves as body. This way the God is imprisoned within our body inhibiting him from doing good to us. God wants us to identify ourselves with soul and not body. Soham technique is affirmation of Saha Aham i.e. soul and not the body. Paramahansa Yogananda wants us to affirm, "I am not a mortal being; I am spirit"

**Surrender to God**

When we have deep sleep at night we are not aware of the body or we cannot think about the problems of world. God wants us to be in this state during day time without getting caught in the dream world created by Him in which we exist. Once we surrender to the Lord there is no consciousness of life and death. Unless we do this, God i.e. soul remains caged in our body helplessly. We have to remember that we are His children. As Paramahansa Yogananda says, "You are loved just as much by God as are Jesus and Krishna. You must seek His love, for it encompasses eternal freedom, endless joy and immortality".

In Bhagavad Gita, Chapter 10, stanza 8,the Lord says, "I am the source of everything, from me all creation emerges. With this realization the wise awestricken, adore Me. Their thoughts fully on Me, at heir beings surrendered to Me, enlightening one another, proclaiming Me always, My devotees are contended and joyful ...." When this state of mind is achieved, "Our fate is not predestined by Him; nor is karma the sole factor, though our lives are influenced by our past thoughts and activities. If you are not happy with the way, the life is turning out, change the pattern. Get busy and weed out the garden of your past. "In other words, it is possible to burn ill effects of karma in wisdom gained while achieving God realization and surrender to Him.

**Conclusion**

The Indian sages have laid down the ways in which while we can use maladies for treatment, we should practice the techniques of even mindedness. "Do not pay undue attention to passing scenes of life. You are the immortal self, living only temporarily in a dream that is sometimes a nightmare." Good and evil naturally coexist. But surrendering to God enables us to rise above the maya of this world.

I have written this article based on teachings of Paramahansa Yogananda for the benefit of fellow pensioners.

***- S.V.Naik,*** Andheri East,Mumbai 400069
Cell # 09821127616

## नेत्र चिकित्सा शिबीर

'वासन आय-केअर' आणि आपल्या असोसिएशनच्या पुणे झोनल सब्-सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने **मोफत नेत्र चिकित्सा शिबीर - दि.१८ ते २३ नोव्हेंबर २०१३** या कालावधीत खालील ठिकाणी आयोजित केले आहे. तरी सर्व सभासद, सहसभासद व फॅमिली पेन्शनर्स यांनी व त्यांच्या कुटुंबीयांनी या शिबीराचा अवश्य लाभ घ्यावा.

स्थळ : वासन आय केअर हॉस्पिटल,
संगम प्रेस जवळ, करिष्मा सोसायटी शेजारी,
कोथरूड, पुणे - ३८; फोन नं.-०२०/३९८९०००० 

वेळ : सकाळी ९ ते दुपारी १ या वेळेत

**होणाऱ्या चाचण्या : 1) Auto Refractive Test, 2) Vision Test, 3) Dilation Test**

**विशेष सूचना :** मोफत चाचण्यांची सवलत ६० वर्षावरील सभासद व कुटुंबीयांसाठीच राहील. ६० वर्षाखालील सभासद वा कुटुंबीयांसाठी तपासणी फी मधे ५०% सवलत, म्हणजे रु.२५०/- ऐवजी रु.१२५/- फी आकारली जाईल.

**- सेक्रेटरी, पुणे झोनल सब्-सेंटर**

# कृतार्थ जीवनाचे रहस्य

सन २००१ मध्ये आपल्या बँकेत व्ही.आर.एस.चा अर्थात स्वेच्छानिवृत्तीचा 'फंडा' आला आणि अनेक कर्मचाऱ्यांचा लोंढा स्वेच्छानिवृत्ती स्वीकारून बँकेतून पुरासारखा बाहेर पडला. त्या वेळी भरपूर पैसे मिळणार होते आणि सर्वांना तणावमुक्त जीवनाचा लाभ होणार होता. स्वेच्छानिवृत्ती स्वीकारण्यामागे प्रामुख्याने कामाचा तणाव, त्या मागील भीती, असुरक्षित वातावरण, एकमेकांविषयीच्या प्रेमाचा-जिव्हाळ्याचा अभाव, बँकेबद्दल कमी झालेला आदर ही कारणे असली तरी त्यापेक्षाही कामाच्या ताणामुळे मनात येणारे नकारात्मक विचार हेच मुख्य कारण होते. त्यापूर्वीही अनेकांनी ह्याच कारणामुळे स्वेच्छानिवृत्ती स्वीकारलेली होती.

स्वेच्छानिवृत्तीची मोठी लाट येऊन आता बारा वर्षे म्हणजे एक तप झाले. आता तरी आपण तणावमुक्त आनंदी जीवन जगत आहात का? निवृत्तीनंतर आपले नकारात्मक विचार, भीती, नैराश्य, ताण-तणाव मनातून पूर्णपणे निघून गेले आहेत का? स्वत:लाच विचारून पाहा. आता आपल्याभोवतालचे प्रश्न अधिकच गहन व भेसूर बनलेले आहे. पण उत्तरे मात्र पूर्वीचीच तीच आहेत. महागाई प्रचंड भडकलेली आहे. डॉक्टर-मंडळींनी भयाचा व्यापार मांडलेला आहे, राजकारण-समाजकारण दूषित झालेले आहे, रोज नवीन रोग जन्माला येत आहेत, बेकारी वाढत आहे, भ्रष्टाचार वाढला आहे, शिक्षणसम्राट उदयास आलेले आहेत.... या व अशाच अनेक कारणांनी सामान्य माणसाच्या मनात नकार वाढत आहेत. ह्या समाजमनाचा परिणाम तुमच्या-आमच्या कौटुंबिक जीवनावर होत आहे. दूरदर्शनवरील मालिका, वर्तमानपत्रे यांच्यामुळे त्यात भरच पडत आहे. थोडक्यात काय तर तुम्ही बँकेच्या एका पिंजऱ्यातून सुटलात आणि आता बिकट परिस्थितीमुळे दुसऱ्या पिंजऱ्यात अडकलात. नकारात्मक विचारांनी आपल्याला घेरलेले आहे आणि आपण भरकटलेले जीवन जगत आहोत. आपल्या बुद्धीचा फाजील अभिमान, गर्वाची भावना, स्वार्थ, वासना, अज्ञान, वाद घालण्याची सवय, प्रसिद्धीची फाजील हौस, दुसऱ्याला तुच्छ लेखण्याची प्रवृत्ती या व अशा अनेक गोष्टींचा परिपाक म्हणजे नकारात्मक विचारांची उत्पत्ती होय. या नकारात्मक गोष्टींना नकारात्मक विचारांची फोडणी मिळते आणि नकारात्मक विचारांचा जोर वाढतच जातो. अर्थात ही प्रवृत्ती गेली तरच सकारात्मक विचारांना चालना मिळेल.

नकारात्मक विचारांमुळे उद्भवणाऱ्या ह्या परिस्थितीवर उपाय शोधण्याचा प्रस्तुत लेखात आपण विचार करणार आहोत. सकारात्मक विचारच प्रत्येक माणसाच्या मनामध्ये नि वर्तनात जादूसारखे बदल घडवतात. त्यासाठी आपण आपल्या मनाचे राजे आहोत हे नेहमी लक्षात ठेवा.

दोन पिढ्यांपूर्वी नीतिमत्ता, प्रेम, संतोष, कृतज्ञता, आदर ही समाजाची संपत्ती होती अन् आधारही होता. पुढे 'ग्लोबल वॉर्मिंग'चा जमाना आला आणि सारा नूरच पालटला. जमीन, भौतिक गोष्टी, पैसा हीच संपत्ती ठरली. मुलांचा पगार लाखात गेला आणि प्रेम-संतोष-आदर लाखेसारखे जळून गेले. भौतिक संपत्ती प्रचंड वाढली. आयुष्यभर भाड्याच्या घरात राहणारी कुटुंबे आता 'सेकंड होम' विकत घेण्यापर्यंत पोहोचली. पण त्यांच्याच मुलांच्या नशिबी पाळणाघर आले व ज्येष्ठांना वृद्धाश्रमांची वाट धरावी लागली.

पण मित्रहो, लक्षात ठेवा की, कोणतीही परिस्थिती कधीच कायम राहत नाही. हिवाळ्यात रात्र मोठी असली तरी हळूहळू दिवस मोठा होत जातो अन् वसंतऋतूचे आगमन होतेच. नकारात्मक परिस्थिती बदलण्याची ताकद व धमक आपल्यातच आहे हे लक्षात घ्या. कारण आपणही त्या परमेश्वराचाच अंश आहोत. संत ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास, विवेकानंद, स्वरूपानंद आदी महनीय व्यक्ती तुमच्या आमच्यासारखीच माणसे होती. आजदेखील अनेक श्रेष्ठ, असामान्य कर्तृत्वाची व बुद्धिमत्तेची माणसे तुमच्या आमच्या आसपास आहेत. त्यांच्याकडे पाहा, त्यांना जाणून घ्या. त्यांनी सतत विधायक व कल्याणकारी असे सकारात्मक विचारच केले. पण सभोवताली नकारात्मक वातावरण असल्यामुळे नवीन पिढीला स्वत:मध्येच वास्तव्य करून असलेल्या परमेश्वराला (परमेश्वरी अंशाला) शोधण्यासाठी वेळच नाही. बारा तास काम, लाख रुपये पगार, डोक्यात 'सेकंड होम'चा विचार, त्यासाठी अधिकाधिक पैसे मिळवण्याचे ध्येय व त्यासाठी धडपड, याशिवाय समाजात दररोज वाढणारी नवनवीन आकर्षणे (अ‍ॅट्रॅक्शन्स) यामुळे आपल्या वासना वाढतच आहे. मंदिरेही राजकारण्यांनी ताब्यात घेतल्याने लोकांचा देवावरील-धर्मावरील विश्वास उडत चालला आहे. तरीही काही निवडक माणसे व संस्था जीवन जगण्याची कला, भय-तणाव-नकार यातून मुक्त होण्याचे मार्ग दाखवीत आहेत. विचारच विश्वाचा सम्राट आहे हे कधीही विसरू नका. ज्या प्रमाणात मनुष्य त्याच्यामध्ये सुप्त रूपात असलेली परमेश्वरी शक्ती वापरेल, त्या प्रमाणात तो नकारात्मक विचारातून मुक्त होईल. जेव्हा आपल्याला माहीत असलेल्या सुंदर गोष्टींमध्ये आपले विचार-भावना क्रिया गुंतलेल्या असतात तेव्हा कोणताही नकारात्मक विचार आपल्या जाणीवेत प्रवेश करू शकत नाही. तेव्हा मित्रहो, सतत आनंदी राहा. संतोष व्यक्त करा. सकारात्मक विचारांचे ध्यान करा. ध्यान धारणेची ऋषिमुनींनाच नव्हे तर आपल्या सर्वांनाच नितांत आवश्यकता आहे.

आध्यात्मिक वाचनाने माणसाचा कल सद्‌गुणांकडे वळतो आणि आपण खऱ्या अर्थाने श्रेष्ठत्वाकडे वाटचाल करतो. आपण सारेजण श्रेष्ठ होण्यासाठीच जन्माला आलो आहोत हे कायम लक्षात ठेवा. परमेश्वराकडे आपण सतत मागतच असतो. कधीतरी तुम्ही स्वत:च परमेश्वर बना. लोकांना शक्य तेवढी मदत करा, काहीतरी देत जा. त्यांची सेवा करा. यातून आनंद द्या आणि आनंद घ्या. हे सर्व निरपेक्ष भावनेने केल्यास त्याचा खरा आनंद नि समाधान तुम्हालाच मिळणार आहे.

तुमचे वय कितीही असो, सतत तारुण्याचाच विचार करा. मनाने तरुण राहा. तुमच्यातील चैतन्य तुमच्या पेशी सदैव कार्यरत ठेवून तुमचे शरीर व मन दोन्ही कार्यक्षम राखतील. हे लक्षात घ्या की, आपले जीवन यशस्वी करण्यासाठी शरीर व मन ही दोनच उपकरणे आपल्यापाशी उपलब्ध आहेत. त्यांचा योग्य वापर करा आणि सदैव होकारात्मक किंवा सकारात्मक विचारच करा. आपण प्रत्येकजण होकारात्मक विचाराचे स्वामी आहोत, यशस्वी जीवनाचे शिल्पकार आहोत हा महत्त्वाचा संदेश ध्यानात ठेवा. आपण आनंद व समाधान मिळवा आणि ते इतरांनाही द्या. आपले जीवन कृतार्थ बनवण्याचं हेच रहस्य आहे.

**- शरद शिंगवेकर,** पुणे
भ्रमणध्वनी - ९४०५०२६४१२


*** HAPPY DIWALI ***

◆ ४रात्र-५दिवस मुंबई ते मुंबई विमान प्रवास
अंदमान आणि हॅवलॉक
सहल खर्च:रु-१४,०००फक्त
विमान प्रवास भाडे अधिक
जानेवारी ते जून पर्यंतचे बुकिंग सुरु आहे

नवीन सहल-मर्यादित जागा -२ ते ८डिसेंबर-
७रात्र-८दिवस
आसाम-मेघालया
गुवाहात्ती-काझीरंगा-शिलॉंग-चेरापूंजी
सहल खर्च:रु-१६,०००फक्त
विमान प्रवास भाडे अधिक

CALL:RAJESH RANADE
email:tourways@yahoo.com
TOURWAYS
9223434354
9223273496
C/305,PALM ACRES M.PHULE ROAD MULUND EAST MUMBAI 400081


## माय माऊली स्टेट बँक - तुझे सलाम

पोटासाठी-नोकरीसाठी वणवण फिरत होतो दारोदारी
आला दिवस भाग्याचा,
घेऊनी एक सुंदर पहाट सोनेरी
स्टेट-बँकेचा आदेश, रूजू होण्याचा संदेश,
आयुष्याला मिळाली कलाटणी
नव्या आयुष्याची मुहूर्तमेढ, झाली सुखाची पेरणी
इडापिडा टळली कायमची, बदलली माझी दशा
दिवस आले सुखाचे, आयुष्याला मिळाली नवी दिशा
स्थिरस्थावर झालो जीवनात,
स्टेट बँक माऊलीची होती सावली
मागे वळून कधी पाहिले नाही,
संजीवनी जीवनाला मिळाली
मुलगी सुखात राहील म्हणून
सासऱ्यांनी दिली त्याची छोकरी
कारण जावयाची होती स्टेट बँकेत नोकरी
संसारात दिला हात मदतीचा,
होती माऊलीची छत्रछाया
मुलांचे शिक्षण, वाहन आणि स्वप्नातील घरकुल झाले
तुझी होती माया
एल.एफ.सी. मुळे झाले निसर्गदर्शन,
पर्यटन आणि चारही धाम
कारण वेळोवेळी माऊली पाठिशी उभी होती ठाम
अपत्यांनाही मिळाला माऊलीमुळे हक्काचा निवारा
होमलोन मुळे मिळाला त्यांना सुखाचा आसरा
सहप्रवासात भेटले अनेक बंधु-भगिनी,
परिचय झाला सर्वांचा
स्टेट बँक कुटुंबात राहून ऋणानुबंध जमला कायमचा
संध्याकाळी जाईन जेव्हा देवाच्या घरी
राहणार नाही मला टेन्शन
कारण अर्धांगिनीलाही मिळेल फॅमिली पेन्शन
पुनर्जन्माची संकल्पना जर असेल खरी
पुढील जन्मीही जन्म घेईन तुझ्याच उरी
अंतिम क्षणापर्यंत उपकार तुझे नाही विसरणार
नतमस्तक होऊनी करतो माऊली तुला नमस्कार!

**- मदनलाल काबरा,** जळगाव
भ्रमणध्वनी - ९७३०५५०४१०

लघुकथा

# घुसमट

नोकरीतून सेवानिवृत्त झाल्यावर माधवराव आणि यशोदाबाईंचा मुक्काम काही दिवस त्यांच्या मुलाकडे अजयकडे मुंबईतच होता. अजय हा माधवरावांचा धाकटा मुलगा. इंजिनिअर झाल्यावर, आपल्या कर्तृत्वावर मुंबईत एका नावाजलेल्या कंपनीत तो मोठ्या पदावर रूजू झाला होता. कंपनीतर्फे त्याला उत्तम फ्लॅटही मिळाला होता. पत्नी मृदुला आणि मुलगी मीना असा छोटेखानी समाधानी संसार. दृष्ट लागण्याजोगा. माधवराव आणि यशोदाबाई मुलाच्या संसारावर एकदम खूश होते. आयुष्यात काही वेळा कठोर निर्णय घ्यावे लागतात. माधवराव आणि यशोदाबाईंनी आपल्या खेडेगावी असलेल्या घरी कायम राहण्यासाठी जाण्याचा घेतलेला निर्णय अशापैकीच होता. परंतु अजयला कसे सांगावे हा त्यांच्यापुढे मोठा प्रश्न होता. एक दिवस त्यांना तशी संधी मिळाली.

''अजय, आम्ही दोघांनी आता आपल्या गावी जुन्या घरी जाण्याचा निर्णय घेतला आहे.''

''अण्णा! काय बोलता हे? इथं काय कमी आहे? जागेचाही प्रश्न नाही. या वयात तुम्ही दोघेही इथंच राहा. खूप सोसलं आहे तुम्ही आमच्यासाठी. आम्हालाही तेवढाच आधार.''

''तुम्ही दोघे मला आई-वडिलांसारखे आहात. घरी परत जाण्याचा विचार तुम्ही सोडून द्या. इथंच राहा. छोट्या मीनाला किती सवय झाली आहे तुमची! तिने विचारल्यावर आम्ही काय सांगायचे?'' मृदुलाने त्यांना समजावण्याचा प्रयत्न केला. पण माधवराव आपल्या निर्णयावर ठाम होते. त्यांनी दोघांची समजूत घातली. सामानाची बांधाबांध केली आणि एक दिवस दोघेही सर्वांचा निरोप घेऊन जड अंत:करणाने बाहेर पडले. अजय त्यांना निरोप देण्यासाठी बसस्टॅंडवर आला होता. बस वेळेवर सुटली. माधवरावांनी रामूला, त्यांच्या घरगड्याला आणि सुमतीला अगोदरच येण्यासंबंधी कळवले होते. गाडी गावात वेळेवर पोचली. स्टॅंडवर रामू वाटच पाहत होता. सुमतीही हजर होती. माधवरावांना पाहून तो गाडीजवळ गेला. रामूने सामान उतरवले. बऱ्याच वर्षांनी मालकांची भेट झाल्यामुळे रामू आनंदात होता. सुमतीने तर आईला बघून चक्क स्टॅंडवरच मिठी मारली. बसस्टॅंड घरापासून जवळच होता. घरी आल्यावर रामू घराचे कुलूप उघडणार इतक्यात माधवराव पुढे आले.

''थांब रामू! आज घराचे कुलूप मी उघडणार. एके काळी या गजबजलेल्या घराला मी कुलूप लावून बंदिस्त केले होते. आता मीच कुलूप उघडून या घराला मुक्त करणार.''

माधवरावांनी कुलूप उघडले. रामूने घर स्वच्छ करून ठेवले होते. वडिलोपार्जित घर. ओटी, पडवी, सोपा, माजघर, मागे परस, विहीर. गावातील घरे साधारण अशाच पठडीतील. नोकरी, शिक्षण, धंद्यासाठी लोक शहरात गेल्यामुळे बरीचशी कुलुपांनी बंदिस्त. माणसांची वाट पाहणारी. रामूने सर्व सामान आत आणले. विहिरीच्या थंड पाण्याने दोघांनी हात-पाय धुतले, डोळ्यावर पाण्याचा हबका मारला. देवाच्या तसबिरीला नमस्कार केला. थंड पाण्याने आपली तहान भागवली आणि दोघेही झोपाळ्यावर विसावले. बरेच दिवसांनी आई-वडील भेटल्यामुळे सुमती आनंदात होती. ती दोघांच्या पाया पडली.

सुमती माधवरावांची धाकटी मुलगी. अभ्यासात पहिल्यापासूनच डोकं कमी. शिकलीही कमी. माधवरावांना मोठी काळजी होती तिची. हिचं पुढे कसं होणार? लग्न, संसार! यशोदाबाईंनी सुद्धा हीच चिंता ग्रासत होती. त्यासुद्धा आपल्या सुमीसाठी 'एखादं चांगलं स्थळ बघा. तिचं एकदा लग्न लावून दिलं म्हणजे आपण मोठ्या जबाबदारीतून मुक्त होऊ' असं म्हणून माधवरावांना मधूनमधून आठवण करून देत असत. कमी शिकलेली म्हणून लग्न जमणं तसं कठीणच होतं. सहज बोलता बोलता माधवरावांनी नारूभटजींकडे सुमीसाठी तिला योग्य असं गावतलंच एखादं चांगलं स्थळ बघा म्हणून शब्द टाकला. नारूभटजींनी माधवरावांना गावातलंच एक स्थळ सुचवलं. मुलगा तसा फार काही शिकलेला नव्हता. घरचं बरं होतं. आई-वडील, शेतीवाडी, घर. शेतीकडेच तो बघायचा. सुमीचं लग्न माधवरावांनी थाटात केलं. सासरच्यांची काही तक्रार नाही. छान संसार चालला आहे सुमीचा.

''आज घरी सैंपाक नाही. आई, अण्णा तुम्ही आमच्याकडेच जेवायचं. सासूबाईंनी मुद्दाम बजावून सांगितलं आहे, दोघांनाही जेवायला घेऊन ये म्हणून.''

''अगं येणारच, आनंदाने येणार'' अण्णा.

जेवण करून आल्यावर माधवराव, यशोदा झोपाळ्यावर थोडे विसावले.

''झालं ना तुझ्या मनासारखं?'' माधवराव.

''म्हणजे तुमच्या मनासारखं झालं नाही का?'' यशोदा.

''तसं नाही गं! निवृत्त झाल्यावर आपल्या स्वत:च्या घरी यायला कोणाला आवडणार नाही? पण या ना त्या कारणाने नाही जमलं. किती वर्षांनी आलोय परत! एके काळी माणसांनी भरलेलं असायचं हे घर! पण हळूहळू माणसंच कमी होत गेली. आपल्या अनुपस्थितीत रामूने घराची चांगली देखभाल केली. तुला आठवतंय? एक वर्षी मुद्दाम दिवाळीत रजा काढून आपण दोघे आलो होतो. आपण येणार म्हणून त्याला केवढा आनंद झाला होता! अंगण स्वच्छ करून, चोपून त्यावर शेणाचा सडा घातला होता त्यानं. तुळशीवृंदावनातील तुळससुद्धा पाणी घालून तजेलदार ठेवली होती. पणत्यासुद्धा स्वच्छ करून ठेवल्या होत्या. रामू आपल्या घरातीलच एक. अतिशय प्रामाणिक आणि विश्वासू. अगं! नात्यांनाही कोडं पडावं अशी काही माणसे

असतात. रामू त्यातलाच एक. तूसुद्धा पणत्यात तेल घालायला त्याला मदत केली होतीस.''

''तुम्ही मात्र झोपाळ्यावर बसून झोके घेत गंमत पाहत होता! आठवतंय का?''

''का नाही आठवणार? संध्याकाळी घर, अंगण, तुळशीवृंदावन पणत्यांच्या मंद प्रकाशातसुद्धा उजळून निघालं होतं. खूप आनंददायी प्रसन्न वातावरण होतं. यशोदा, आपण गावी येण्याचा निर्णय घेतला हे बरं केलं. पण छोट्या मीनाची खूप आठवण येतेय. तिच्या बाबांनी हट्ट पुरवला नाही तर आपल्याला येऊन बिलगायची. मुलगी मोठी गोड, लोभसवाणी, मोठ्या डोळ्यांची. अजूनही ती डोळ्यासमोरून हलत नाही. आपली आठवण तर काढत नसेल?''

''मायेच्या पाशात किती अडकायचं? राहू दे त्यांना आता स्वतंत्र, मोकळेपणाने. आता त्यांचे निर्णय त्यांनीच घ्यायला हवेत. घार पिलांवर लक्ष ठेवते पण पिलांच्या पंख विकासाच्या आड ती येत नाही आणि अगदीच अडचण आली तर आपलं घरटं उघडंच आहे, त्यांना मायेची ऊब द्यायला. त्यांनी केव्हाही यावं, राहावं. पाखरांना बोलावताना कणगीतले दाणे मोजायचे नसतात.''

''यशोदा, माणसाचं जीवन कसं असतं नाही? सगळंच अनिश्चित. कोणत्या क्षणी काय होईल याचा थांगपत्ता लागणार नाही. आपला मोठा अरुण, खूप हुशार. एन्.डी.ए.ची परीक्षा उत्तम रीतीने पास झाला. आर्मीमध्ये ऑफिसरही झाला. किती भाग्याची गोष्ट होती ही आपल्यासाठी! माझ्या अगदी निकटच्या मित्राच्या माहितीतील एक चांगली मुलगीही त्याच्यासाठी सांगून आली होती. सर्वांच्या पसंतीने लग्न ठरलं. त्यासाठी त्याने रजाही काढली होती. मग अचानक एके दिवशी बातमी आली. काश्मीर बॉर्डरवर अतिरेक्यांनी केलेल्या भीषण गोळीबारात अरुण शहीद झाल्याची. केवढा धक्का होता! दोघांनी एकमेकांच्या साथीने आपण तो सहन केला. सरकारी इतमामात त्याच्या पार्थिवाला अग्नी देण्यात आला. महत् प्रयासाने आपण अश्रू आवरले. तूसुद्धा मोठ्या धीराची. देशासाठी आपला मुलगा शहीद झाला, त्याला वीरमरण आले, यातच सर्व दु:ख विसरून आपण समाधान मानले.''

''कशाला त्या आठवणी काढता?''

''अगं, या आठवणी म्हणजे हृदयावर कोरलेले एक एक शिलालेख आहेत. नाही म्हटलं तरी कडू-गोड आठवणी येतच राहतात. आपली मोठी सुनंदा शिकली, सवरली. जराशी हट्टीच. शेवटी त्या रिक्षावाल्याबरोबर पळून गेली. आपण तिची किती समजूत घातली. ''मुली, नीट विचार कर. पुरतं आयुष्य अजून जायचंय. तो रिक्षावाला काही शिकलेला नाही. त्याची मिळकत काय? तो संसार काय करणार? तुझ्यासाठी एखादा चांगला मुलगा आम्ही बघू. पण तू हा हट्ट सोड. अगं! तुझ्या भल्यासाठीच सांगतो आहोत. नाही ऐकलं. शेवटी तिचाच हट्ट तिने पुरा केला. कुठं असेल?''

''पुन्हा पुन्हा तुमचं आपलं तेच. गेल्यापासून तिने काही कळवलं आहे का? कुठं आहे, कशी आहे? आता आपणच निष्ठूर बनायला हवं. आता ती आणि तिचं नशीब.''

''सगळं समजतंय गं मला! भल्याबुऱ्या आठवणींचे फेरेच असे असतात. माणूस कितीही सावध असला तरी त्यात तो अडकतोच.''

''पण माणसं भूतकाळातील चांगल्या आठवणी विसरून कटू आठवणींचाच जास्त विचार करतात आणि वर्तमानातल्या आनंदाला पारखी होतात. तुम्हीही त्यातलेच. सुमीचा विचार करा. कमी शिकली तरी सर्वांना सांभाळून उत्तम संसार करीत आहे ना? अजयचा संसार कसा छान चालला आहे? या आठवणीतच सदोदित आपण आनंदाने उरलेलं आयुष्य जगायला पाहिजे.''

माधवराव आणि यशोदा यांच्या मधूनमधून झोपाळ्यावर बसून अशाच गप्पा चालायच्या. दोघांचाही आता दिनक्रम ठरलेला. सकाळी रामू केर काढून अंगण स्वच्छ करायचा. यशोदाबाई त्यावर सडा टाकून तुळशीवृंदावनासमोर सुरेख रांगोळी काढून पणती लावायच्या. दारासमोरसुद्धा छोटीशी रांगोळी रोजच असे. माधवरावांचा वेळ सकाळी पूजाअर्चा यातच जात असे. जेवणानंतर दुपारी वामकुक्षी. संध्याकाळी दोघेही न चुकता गावातील गणपतीच्या मंदिरात दर्शनाला जात. सुमतीसुद्धा वेळ मिळेल तशी दोघांना भेटायला यायची. मग गप्पांना रंग चढायचा. रामूचीही दोघांना सोबत होतीच.

आज माधवराव संध्याकाळी गणपतीदर्शनाला जाण्याच्या तयारीत होते. सैंपाकघरात शांतता होती. यशोदाबाईंची चाहूल घेत ते ओसरीवर आले. झोपाळ्यावर कलंडलेल्या यशोदाबाईंना पाहून म्हणाले, ''यशोदा गणपतीला जायचं ना? मग आवर लवकर.'' काहीच प्रतिसाद मिळत नाही हे पाहून त्यांनी यशोदाबाईंना दोनदा हलवले. त्या निपचित पडल्या होत्या. त्यांनी रामूला हाक मारली. ''रामू, ताबडतोब भिडे डॉक्टरांकडे जा आणि त्यांना घेऊनच ये.'' भिडे त्यांचे फॅमिली डॉक्टर. त्यांनी आल्यावर यशोदाबाईंना तपासले. त्यांनी एकवार माधवरावांकडे पाहिले. त्यांच्या नजरेतूनच माधवराव समजून चुकले. सर्व काही संपले होते. ते सुन्नपणे झोपाळ्यावरच बसले. रामू तर पार हादरून गेला होता. तसाच तो सुमतीच्या घरी गेला. ''बाईसाहेबांना बरं नाही, तुम्हाला ताबडतोब बोलावलं आहे'' असं सांगून तो लगेचच आला. डॉक्टर माधवरावांचे सांत्वन करीत होते. अजयला कळवण्याची व्यवस्था केली. सुमतीकडील सर्वजण आले. त्यांना काय समजायचे ते समजले. मोठा कठीण

प्रसंग होता तो. सुमती तर फारच भांबावून गेली. सासुबाई तिची समजूत काढीत होत्या.

अजय, मृदुला, मीना दुसरेच दिवशी आले. सर्व विधी पार पडल्यावर अजय मुद्दाम काही दिवस राहिला. मृदुलाने घर चांगले सांभाळले. दोघांनी माधवरावांना पुन्हा मुंबईला येऊन राहण्याचा आग्रह केला; परंतु ते आपल्या निर्णयावर ठाम होते. जाताना दोघेही सुमती आणि रामूला 'अण्णांची काळजी घ्या' सांगण्यास विसरले नाहीत.

माधवराव तसे मनातून खचले होते. एकटेपणाचे शल्य त्यांना बोचत होते. तरी पण त्यांनी आपला नित्यक्रम सुरू ठेवला होता. रामू नेहमीप्रमाणे आपली कामे करीत होता. सुमतीकडून दोन्ही वेळा जेवणाचा डबा आणणे रामूच करीत होता. मधून मधून सुमती स्वत: येऊन अण्णांना भेटायची. त्यांची विचारपूस करायची.

एके दिवशी अंगण झाडताना रामूला माधवराव कुणाशीतरी बोलत असल्याचा आवाज ऐकू आला. सकाळी सकाळी माधवरावांशी गप्पा मारायला कोण आलंय, हे बघण्यासाठी तो घरात गेला. माधवराव झोपाळयावर बसून स्वत:शीच मोठमोठ्याने बोलत होते. दारातूनच तो परत फिरला. सुमती आल्यावर त्याने ही गोष्ट तिच्या कानावर घातली. आता अण्णांना फारच जपायला हवं!

आज ती मुद्दाम अण्णांचा सकाळचा जेवणाचा डबा घेऊन आली होती. दार अर्धवट उघडंच होतं. अण्णांचा बोलण्याचा आवाज तिनंही ऐकला. दार उघडून ती आत गेली.

''अण्णा! कुणाशी बोलत होता एवढं?''

''अगं यशोदेशी, मस्त गप्पा रंगल्या होत्या.''

''अण्णा हे आता विसरायला हवं. कशाला आता आईची एकसारखी आठवण काढता? तब्येतीवर परिणाम होतो याचा.''

''तू म्हणतेस, कशाला आठवण काढता तिची? जरासं नैराश्य, मनाची घुसमट झाली की तीच येते सांत्वन करायला. अगं, सावलीला कधी बोलवावं लागत नाही. आयुष्यभर चांगली साथ लाभली तिची. नेहमी पाठीशी असायची. म्हणायची, ''मला मागे सोडून जायचं नाही हं!'' मोठं असं आजारपण कधी तिला माहीत नव्हतं. शेवटी तीच मला मागे सोडून गेली.

''अण्णा! का मनाला त्रास करून घेता? तुम्हाला म्हटलं आमचेकडे येऊन राहा, लक्ष राहील आमचे. सासू-सासरेही म्हणत होते त्यांना आपल्याच घरी घेऊन ये म्हणून.''

''अगं! तो त्यांच्या मनाचा मोठेपणाच म्हणायला हवा.''

''अण्णा! एवढ्या मोठ्या घरात या वयात एकटं राहाणं बरं नव्हे! पण तुम्ही तुमचा हट्टच सोडायला तयार नाही.''

''मी एकटा नाही. रामू आहे ना सोबतीला. अगं! मी ओसरी आणि सैंपाकघर फक्त वापरतो. बाकी सगळीकडे कुलपं लावली आहेत. एके काळी या घरात माणसांचा नेहमी राबता असायचा. या खोल्या आल्यागेल्यांचे स्वागत करायच्या. त्यांनाच आता कुलपात बंदिस्त करताना हात थरथरले माझे. माझ्या मनाची किती तगमग झाली, माझे मलाच माहीत. जाऊ दे! काही इलाज नाही. जे समोर येईल ते स्वीकारण्याची माणसाची तयारी हवी.''

''बरं! मी डबा आणलाय. तुम्हाला आवडणारी डाळिंबी उसळ आणली आहे. गरम आहे तोपर्यंत जेवून घ्या. उद्या चतुर्थी आहे. उकडीचे मोदक आणणार आहे. सासुबाई छान कळीदार मोदक करतात. सारखी सारखी आईची आठवण काढीत बसू नका.''

''सुमे! किती करतेस गं माझ्यासाठी? तुला उशीर होतोय. ये आता.'' घरचे वाट पाहात असतील. माझी काळजी करू नकोस आणि जाताना तेवढं दार लोटून घे.''

लोटलेल्या दारावर क्षणभर माधवरावांची नजर स्थिरावली. झोपाळ्याचे झोके थांबवून ते दाराजवळ गेले. त्यांनी दार थोडंसं उघडंच ठेवलं. यशोदा पुन्हा सांत्वन करायला येईल या आशेनेच.

- **प्रभाकर गुपचूप,** पुणे
मोबा. - ९८८१५७९४९९

## कोई तुम्हें क्या देता है?

मेरे रास्तों की मुश्किलों को हटा देता है,
मेरा हौसला मुझे मंजिल का पता देता है ।

भले तोड देता है जमाना मेरी हिम्मत
मेरा फन मुझे जीने का हौसला देता है ।

वो जुबां से नहीं अपनी आँखो से बोलकर
उसके दिल में क्या है जता देता है ।

अपनी तकदीर को न कोसो तुम दोस्त
वक्त बुरा हो जाए तो सजा देता है ।

तुम अच्छे हो तो ये कहते मत फिरो
तुम्हारा मिजाज ये सबको बता देता है ।

तुम सबको हमेशा बस प्यार दो 'चन्द्र'
ये ना देखो कोई तुम्हें क्या देता है।

**- चन्द्र वजीरानी,नागपूर**
**मो. : ९८२२७१७४९८**

लघुकथा

# नवजीवन की नवे बंधन

अनंतराव सकाळचे फिरणे आटोपून, निवांतपणे पेपर वाचता वाचता, गरम चहाचे घुटके घेत असताना, त्यांचे लक्ष एका जाहिरातीने वेधून घेतले. गेले ४-५ दिवस ही जाहिरात सारखी त्यांच्या नजरेस भरत होती, खुणावत होती. ती पुन्हा त्यांनी आज नजरेखालून घातली. जाहिरात अशी होती.

**''नवजीवन की नवे बंधन''**

एकाकी आयुष्य कंठणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांसाठी... आपला जीवन-साथी दुर्दैवाने आपल्याआधी हे जग सोडून गेला/गेली, आता उर्वरित आयुष्य आपण एकाकी घालविणार का? आपले उर्वरित जीवन सुखाचे समाधानाचे व्हावे असे आपणास वाटते का? आपल्याला ह्या वयात समवयस्क जोडीदार हवा आहे का? आपली मुले/मुली परगावी/परदेशी त्यांच्या संसारात रमलेली आहेत. तुमचा मार्ग तुम्हालाच शोधायचा आहे. त्यासाठी नव-जीवन ह्या आमच्या समाज कार्य करणाऱ्या संस्थेने एक, एकाकी असणाऱ्या स्त्री-पुरुषांसाठी मेळावा दि........ रविवार रोजी रोज गार्डन येथे सकाळी १० ते सायं. ५ वाजेपर्यंत आयोजित केला आहे.

आपणास यात सहभाग नोंदवायचा असेल तर कृपया आम्हाला फोन नं............ मो. नं.............. वा ई मेल.................. वर संपर्क साधावा.

मेळाव्यासाठी फक्त रु.२५०/- प्रवेश फी असून त्यात सकाळचा नाश्ता, दुपारचे शाकाहारी जेवण व दुपारचा चहा असेल. मेळाव्यात फक्त प्रथम येणाऱ्या १०० लोकांनाच प्रवेश असेल. तरी त्वरित संपर्क साधावा, ही विनंती.

**आयोजक, नव-जीवन**

बऱ्याच विचाराअंती अनंतरावांनी 'जाऊन पाहण्यास काय हरकत आहे?' अशी मनाची समजूत घालून 'नव-जीवन'शी संपर्क साधून नाव नोंदविले.

रविवार उजाडला. अनंतरावांनी आपला ठेवणीतला पोषाख, रेमण्डची डार्क पॅण्ट व निळा आकाशी रंगाचा शर्ट घातला. वरून सेंटचा एक हलकासा फवारा मारला व सकाळी ९॥ लाच बाहेर पडले. रोज गार्डनला वेळेत १० वाजता पोहचले. आयोजकांकडे नाव रजिस्टर केले, पैसे भरले. एक वैयक्तिक माहिती असलेला फॉर्म भरला. इडली-सांबार व चहाचा समाचार घेऊन स्थानापन्न झाले.

आयोजकांनी थोडक्यात मेळाव्यासंबंधी प्रास्ताविक केले. प्रयोजन सांगितले. बदलत्या काळाची गरज अधोरेखित केली; परंतु त्यांनी त्याचबरोबर आपापल्या जबाबदारीवर,ओळख, संबंध, स्नेह वाढवावेत व योग्य विचाराअंती निर्णय घ्यावा असे आवाहन केले. संस्था भविष्यातील कोणत्याही उद्‌भवणाऱ्या वादाला, समस्येला जबाबदार राहणार नाही असेही सूचित केले.

नंतर सर्व उपस्थितांनी एक-एकट्याने व्यासपीठावर येऊन थोडक्यात आपला परिचय करून दिला. आपल्या आवडी-निवडी, अपेक्षा सांगितल्या. ह्या साऱ्या सोपस्कारात साधारण १॥ ते २ तास गेले. नंतर सर्व सभासद परस्परांशी बोलून एकमेकांशी संपर्क साधू लागले. ज्याच्याविषयी किंवा जिच्याविषयी आकर्षण जाणवू लागले असे स्त्री-पुरुष हळूहळू गप्पात रंगू लागले. तोपर्यंत दुपारच्या जेवणाची वेळ झाली. बुफेचे ताट सांभाळत जेवतानाही अनेक जण/जणी एकमेकांशी संवाद साधू लागले.

दुपारच्या चहापर्यंत अनंतरावांनी शीला फाटक व निला पाठक ह्या दोन महिलांशी चांगलीच जवळीक साधली. साठी जवळ आलेली असली तरी त्या दोघींचा उत्साह वाखाणण्या जोगा होता. हास्यविनोदांची कारंजी उडत होती. बऱ्याचशा आवडी-निवडी, विचार जुळू लागले होते. गप्पात अनंतरावांनी आपल्या एकटेपणाचा उल्लेख केला, तेव्हा निलाबाईंच्या डोळ्यात पाणी तरळले, तर शीलाबाईंचा कंठ दाटून आला. वृद्धपणात कोणाच्या तरी मानसिक आधाराची गरज असते, त्यामुळे वृद्धांचे सहजीवन या विषयावर तिघांचे एकमत होत होते. मधेच शीला फाटक दुसऱ्या कुणा गृहस्थाबरोबर बोलत बोलत वेगळ्या टेबलावर जाऊन बसल्या. अनंतरावांचे तिकडेही बारीक लक्ष होते, पण आता निलाबाई समोर असल्याने त्यांनी त्यांना प्रपोज केले. निलाबाईंनी अनंतरावांना लगेच होकार दिला नाही; परंतु एकमेकांचे मोबाईल नंबर्स दिले/घेतले. दोन दिवस विचार करून मगच निर्णय घेण्याचे त्यांनी ठरविले. नंतर सगळ्यांनीच एकमेकांचा निरोप घेतला व जाताना संयोजकांचे आभार मानले.

नंतरचे दोन दिवस अनंतरावांचे फार घालमेलीत गेले. आपण करीत आहोत ते योग्य की अयोग्य. मुलांची प्रतिक्रिया काय असेल? आपल्या विसराळू स्वभावामुळे भविष्यात काही प्रॉब्लेम आला तर? मागचे जीवन आपण विसरू शकत नाही, ते तर अत्यंत सुखा-समाधानात गेलेले आहे. पण उर्वरित आयुष्य चांगले जाईल की नाही, असे द्वंद्व त्यांच्या मनात सतत सुरू होते. उद्या सकाळी फोन करायचा होता. रात्रभर अनंतरावांचा डोळा लागला नाही.

सकाळचे सर्व कार्यक्रम आटोपून १० च्या सुमारास त्यांनी फोनची डायरी काढली व मोबाईल हातात घेतला. आधी शीला फाटक यांचा नंबर समोर आला आणि अनंतराव विचारात पडले. त्यांच्या स्मृतीने दगा दिला. शीला की नीला? फाटक का पाठक? आपण कोणाला प्रपोज केले? आपल्याला दोघींपैकी कोण जास्त योग्य वाटले? काही केल्या त्यांना नीटसे आकलन होईना. दोन्ही स्त्रियांचे चेहरे समोर येत होते. पण त्यात निला कोण व शीला कोण? पाठक कोण व फाटक कोण? काय करावे? कुणाला प्रथम फोन लावावा? ह्या गोंधळात अर्धा तास गेला. तेवढ्यात अलका त्यांची कन्या हिचा न्यूयॉर्कहून फोन येऊन गेला. तिने त्यांच्या प्रकृतीची मायेने चौकशी केली. नातवंडांची खुशाली सांगितली. जावईबापूंच्या प्रमोशनबद्दल सांगितले. मे-जून मध्ये न्यूयॉर्कला जरूर या म्हणून आग्रहाचे निमंत्रण दिले. ह्या सर्व संभाषणात १५-२० मिनिटे गेली. त्यामुळे मनातला गोंधळ पुन्हा वाढला. अलकाची आई म्हणजे शांताबाईंची, पत्नीची आठवण जागी झाली.

शेवटी मनाचा हिय्या करून त्यांनी मोबाईलवर नंबर लावला, तो नीला पाठक यांनी घेतला.

हॅलो! हो हो मी अनंतरावच बोलतोय. हो. हो. आपलं फोन करायचं ठरलंच होतं. हो हो बोलाना, आपण निला पाठक बोलताय ना, माफ करा माझा जरा गोंधळ होतोय. मी त्या दिवशी तुम्हाला प्रपोज केले की, शीला फाटक यांना हेच मला आता नक्की आठवत नाहीये.

''माफ करा अनंतराव, मीही थोडी गोंधळले आहे. मी तुम्हाला हो म्हटले की नाही म्हटले हेच मलाही आता आठवत नाहीये. पण माझी अडचण अशी आहे की मी पुढच्या आठवड्यात माझ्या मुलाकडे बंगलोरला राहायला जात आहे. म्हणजे माझा प्रश्न मिटला. ''तुम्ही शीलाला फोन करून बघा.''

अनंतराव थोडा वेळ विचार करू लागले. आता काय करावे, तेवढ्यात मोबाईल वाजला. ''हॅलो, मी शीला फाटक बोलतेय.'' ''हो हो बोला बोला, नमस्कार! कशा आहात?'' ''हॅलो, अनंतराव मी श्री. यशवंत जोशी यांचे सोबत काही दिवस एकत्र काढणार आहे. असे आमचे कालच ठरले, हे कळविण्यासाठीच मी फोन केला होता. ठेवते, मी जरा घाईत आहे.''

अनंतराव सुन्न झाले. थोडा वेळ नुसतेच शांत बसून राहिले. पुन्हा मोबाईल वाजला. दिल्लीहून शरदचा फोन होता. अहो बाबा, तुमचा मोबाईल सकाळपासून सारखा एंगेज लागत आहे. काय झालं, तब्येत बरी आहे ना? ''तुम्हाला एक आनंदाची बातमी सांगायची आहे.''

''बोल, बोल! मी ऐकतोय.'' ''बाबा मी पुण्याला बदली मागितली होती ती माझी विनंती कंपनीने मान्य केली आहे. मी पुढच्या महिन्यात पुण्याला हजर होत आहे. आपण सारे आता एकत्र राहू. अमेय आणि अनिता तुमची सारखी आठवण काढीत असतात. आजोबांकडे केव्हा जायचे म्हणून विचारीत असतात. सीमाही खुश आहे, तिचे सासर-माहेर पुण्यातच असणार म्हणून! अच्छा, प्रकृतीची काळजी घ्या! ठेवतो!''

अनंतरावांच्या समोर आपल्या गोड नातवंडांचे चेहरे आले. सीमासारखी गुणवान सून, सून नाही मुलगीच आणि लाडके चिरंजीव शरदराव.

खऱ्या अर्थाने अनंतरावांचे एकटेपण आता संपणार होते! खरे नव-जीवन आता सुरू होणार आहे. थोडक्यात वाचलो! चला मस्तपैकी चहा घेऊ या!

**- वसंत धुपकर,** पुणे

दूरध्वनी - ०२० - २०२५५४०८

## साठावं वरीस धोक्याचं

होऊन रिटायर घरी बसायचं की
गावभर फिरफिर फिरायचं
साठावं वरीस धोक्याचं हो
साठावं वरीस धोक्याचं ।।धु।।

आवडीनी चिक्की खाल्ली हो
कवळीत अडकून बसली हो
बघुनी बायको मारी टोमणा
कशाला खा खात सुटायचं ।।१।।

सुरत पाहुनी तरुणीची
काच तडकली चष्म्याची
तिला पाहता भान न उरलं
हातामधल्या काठीचं ।।२।।

संध्याकाळी बागेतून
जोड्या बघतो निरखून
बायकोला मग गुपित कळलं
माझ्या वाढत्या बी. पी. चं ।।३।।

**- उज्ज्वला कुलकर्णी,** पुणे

मो. ९८९०९४६६८४

## प्रतिसाद

प्रथमत: 'संवाद'च्या दशकपूर्तीनिमित्त शुभेच्छा. 'संवाद'ची प्रगती उत्तरोत्तर अशीच होत राहो हीच सदिच्छा.

'संवाद'मधील लेखासंबंधी, मजकूरासंबंधी वाचक वेळोवेळी आपल्या प्रतिक्रिया देतच आहेत. 'संवाद'मध्ये त्या प्रसिद्धही होतात. दशकपूर्तीनिमित्त त्याचीच ही उजळणी.

१) सेवानिवृत्तांच्या संघटनेसंबंधी सर्व सविस्तर, अद्यावत व अधिकृत माहिती केवळ 'संवाद'मुळेच समजते.

२) बँकेच्या निरनिराळ्या योजनांसंबंधी - विशेषत: वैद्यकीय फायद्याच्या योजना, कारलोन, गृहकर्ज योजना, निवृत्त कर्मचाऱ्यांना मिळणारे फायदे इ. संबंधी सर्व माहिती फक्त 'संवाद'मुळेच आम्हाला मिळते.

३) सभासदांना वैयक्तिक पत्रे, सक्युलर्स, सभेच्या नोटिसा, इ. पाठविण्याचा हजारो रुपयांचा खर्च संवादमुळेच वाचला आहे.

४) सभासदांच्यामधील सुप्त गुणांना उर्जा देण्यासाठी त्यांच्याकडून लेख, कविता, विनोद-चुटके मागविले जातात व त्यांना प्रसिद्धी मिळते. लेख स्पर्धा हे याचे उत्तम उदाहरण.

५) सभासदांच्या जवळच्या नातेवाईकांच्या वैयक्तिक कर्तृत्वाला योग्य ती प्रसिद्धी देऊन त्यांचे कौतुक केले जाते.

६) सभासद, सहसभासद यांना 'वाढदिवशी' शुभेच्छापत्र पाठवून त्यांचा एक प्रकारे सन्मानच केला जातो.

७) सवलतींच्या सहलीची खास सभासदांसाठी जाहिरात दिली जाते.

८) काही दैनिकांचे संपादकीय जसे खास आकर्षण असतेच तसेच 'संपादकीय' वाचल्याशिवाय 'संवाद'चे पुढचे पान वाचले जात नाहीच. उत्तम संपादकीय.

'संवाद' कधी येतो याची हुरहुर लागणे हेच 'संवाद'चे उत्तुंग यश.

पुनश्च 'संवाद'च्या पुढील यशस्वी वाटचालीला लाख लाख शुभेच्छा.

- **दत्तात्रय बेंद्रे,** सोलापूर

****

सेवानिवृत्तीच्या काळानंतर. आजतागायत काहीही लिहिणे केले नाही. पण 'संवाद'मुळे सर्व सेवानिवृताना प्रत्येक महिन्याच्या 'संवादा'तून बँकेच्या कामाबद्दल आणि सेवानिवृत्तांबद्दल माहिती आणि ज्ञानामृत देण्याचे काम 'संवाद'ने केले आहे. त्याबद्दल संघटनेचे ज्येष्ठ पदाधिकारी बी. जी. दांडेकर, व्ही. एम. गोखले, आर.एन. लळिंगकर या सारख्या अनेक सहकारी पदाधिकाऱ्यांनी 'संवाद'साठी दिवसाचे २४ तास झिजवले आहेत. त्याबद्दल आपणा सर्वांचे हार्दिक आभार!

'संवाद' आम्हा सर्व सेवानिवृताना, लाईफ सर्टिफिकेट, महागाई भत्ता वाढल्याबद्दल. तसेच बँकेच्या मॅनेजमेंट बरोबरच्या घडत असलेल्या चर्चा आणि फेडरेशन कडून चालू असलेल्या कोर्ट केसेसबद्दल माहिती प्रत्येक अंकात देत आहेत. त्यामुळे आम्हा सर्वांमध्ये एकजुटीची भावना निश्चितच वाढत आहे.

'संवाद'च्या पुढील वाटचालीसाठी अनेक शुभेच्छा!

- **आर. एच. भाकरे,** सोलापूर

****

'संवाद'च्या ऑगस्ट २०१३ मधील Religion and Spirituality ह्या लेखात श्री. एस. व्ही. नाईक यांनी धर्म आणि अध्यात्म यातील फरक चांगल्या रीतीने उलगडून दाखविला आहे. ह्या लेखात योगांबद्दलही माहिती आलेली आहे. त्यात गीतेच्या पाचव्या अध्यायात ज्ञानयोगाचा आलेला उल्लेख कदाचित राजयोगाबद्दल असू शकतो असे श्री. नाईक यांना वाटते.

'संवाद'मधील इतर लेखही दर्जेदार आहेत.

- **च. र. पाटणकर,**
भ्रमणध्वनी - ९७५७००९१०२८


**'मराठी प्रवास वर्णन'**
**लेखक-वाचक मंच, कल्याण** तर्फे
घेण्यात आलेल्या
'प्रवास पुस्तक - स्पर्धा (२०११)' मध्ये
तृतीय पारितोषिक विजेते पुस्तक
**'वैभवशाली अमेरिका'**
एक प्रवास वर्णन
(पृष्ठे १२८)
**लेखक : विजय रामचंद्र भुस्कुटे**
पुस्तकाची मूळ किंमत रु.६००/-
सवलतीची किंमत रु.४००/-
(टपाल खर्चासहित)
**संपर्क - श्री.विजय रा.भुस्कुटे**
e-mail : vijay.bhuskute@yahoo.com
Mobile No.09920045135

# 'संवाद' लेख स्पर्धा २०१३

## स्त्री विभाग – तृतीय पारितोषिक विजेता लेख

# आजी आजोबा– अपेक्षा व उपेक्षा

आपले मन जागृत असले की, आजूबाजूचे सर्व काही स्वच्छ दिसते. नात्यांची उकल सहज होते आणि निवृत्ती नंतरच्या, या पन्नाशी नंतरच्या वयात तर पूर्वीच्या घटना, अगोदरच्या पिढीबरोबरचे आपले नाते संबंध, त्या वेळेस उकलले नसतील एवढे उकलू लागतात. त्याच बरोबर पुढील पिढीच्या वागण्याचे संदर्भ लागतात. फक्त इच्छा हवी.

सर्व प्रथम आपण 'अपेक्षा' या शब्दाची व्याप्ती लक्षात घेऊ. आपल्या उत्कट इच्छा, भावनांचे रूपांतर आपल्या नकळत अपेक्षांमध्ये होत असते. इथेच आपण बऱ्याच गोष्टींचे भान ठेवणे गरजेचे आहे. आजच्या बऱ्याच गोष्टींचे भान ठेवणे गरजेचे आहे. आजच्या अति जलद धावणाऱ्या या युगात, बदलते समाज जीवन, त्याचा कळत नकळत सर्व पिढ्यांवर होणारा सकारात्मक वा नकारात्मक परिणाम यामुळे असे होऊ शकते की, आपल्या अपेक्षा पूर्ण न होता त्यांचे केवळ भावनात्मक ओझे होते. अपेक्षा दोन्ही कडून असतात. तरुण पिढीच्याही आपल्या कडून त्या असतात. ह्या अपेक्षा दोन्ही पिढ्या किती प्रगल्भपणे पाहतात वाचतात व अनुभवतात ह्यावर पिढ्यांचे नाते संबंध अवलंबून राहतात. ह्या साठी शालेय शिक्षणाचा तसा संबंध असत नाही. कित्येक अडाणी आजी-आजोबा ह्या गोष्टी समजून घेताना दिसतात. अपेक्षांचे ओझे होण्याआधीच दोन्ही पिढ्यांनी त्याबाबत सारासार विचार करणे, त्यांना आनंदी व आशादायी जगणे शिकवते.

नातवंडे ही दुधावरची साय! कितीही शिस्तीचे आई वडील असले तरी ते आजी-आजोबांच्या भूमिकेत गेल्यानंतर त्यांची मानसिकता पूर्णपणे बदलते. आपल्या मुलांच्या वेळी ज्या गोष्टींसाठी आपण कडक शिस्त बाळगत होतो ती शिस्त आता चिमण्या नातवंडांबाबत शिथिल झालेली दिसते. बऱ्याच वेळी बदलत्या काळाबरोबर काही जुन्या गोष्टी हद्दपार झालेल्या आढळतात तर काही नव्या गोष्टी, ज्या पूर्वी माहितही नव्हत्या, आजच्या जीवनात अविभाज्य स्थान पटकावून बसल्या आहेत.

घरात आजी-आजोबा असावेत की नाहीत ह्या प्रश्नाचे उत्तर काही अपवादात्मक उदाहरणे वगळता होय असेच येईल. चिमणी पाखरं जशी घरातली हिरवळ आहेत तशी त्यांचे आजी-आजोबा त्यांच्यावर मायेची पाखर निरपेक्षपणे करणारी कारंजी आहेत. घरातल्या तरुण पिढीला प्रत्येक गोष्टीत आधार देणारे वड आहेत. त्यांच्या प्रेमाच्या छत्रछायेत, बाहेरच्या, अति जलद, अस्थिर, ताणतणावाच्या परिस्थितीला ते सामोरे जाताना शांत मनाने, आत्मविश्वासाने जाऊ शकतात. माझ्या प्रेमळ सासू-सासऱ्यांनी घरात मायेची खंबीर साथ दिल्यामुळेच मी नोकरी निर्धास्तपणे करून मुलांना चंगले शिक्षण देऊ शकले. संस्कारांचे बाळकडू जे त्यांच्या आजी-आजोबांनी त्यांना दिले त्यावर त्यांची मने फुलली, प्रगल्भ झाली, आज मी तेच माझ्या नातवंडांसाठी करणे हे माझे कर्तव्यच आहे, माझ्या मुला-सुनेवर उपकार नव्हेत.

आज बहुसंख्य घरातली तरुण पिढी घरापासून लांब आहे. दूरच्या शहरात दुसऱ्या देशात त्यांनी त्यांचे कार्यक्षेत्र निवडले आहे. काही सुदैवी आजी-आजोबा त्यांच्या सोबत जाऊ शकतात तर काहींना ती संधी नसते. पण तरीही आजच्या अति जलद काळाच्या कृपेने फोन, मोबाईल, फेसबुक अशा गोष्टींनी ते आपल्या चिमुकल्या नातवंडांशी संपर्क ठेऊ शकतात. आई-बाबा जवळ असले तरी त्यांच्या घरात नसण्याने ह्या मुलांच्या जीवनात जी पोकळी निर्माण होते ती आजी-आजोबांच्या प्रेमाने नक्कीच भरून निघते.

असे असूनही हे चित्र बऱ्याच वेळा उलटे दिसते. आजी-आजोबा विकलांग झाले असल्यास किंवा आर्थिक दृष्ट्या अस्थिर असल्यास भावंडांमध्ये त्यांना सांभाळण्यावरून तेढ दिसून येते. कधी कधी एकुलत्या एक असलेल्या पोटच्या गोळ्याला आपल्या म्हाताऱ्या आई वडिलांच्या खस्तांची आठवण राहि**लेली नसते. घरात** आजी-आजोबांची भूमिका निभावणारी पिढी पूर्णपणे असुरक्षित व दु:खी असते. खरोखरच ही वेळ कुणावरही न येवो. घरातल्या आजोबांशी बोलायलाही नातीला बंदी केलेली घरे आहेत. घरातल्या वृद्धांना अपमानास्पद वागणूक देताना, आपली मुले आज हे पहात आहेत व उद्या तीही त्याच वाटेने जाणार आहेत. हे तरुण पिढीने कायम लक्षात घ्यावे. शारीरिक दुखणी तर कधीही कुठल्याही वयात येऊ शकतात! एकमेकांच्या साथीने घरातल्या लहानग्या पिढीची जपणूक करणे नितांत गरजेचे आहे.

आजी-आजोबा हे घरात, निसर्गातील वृक्षांचे काम करतात. सर्वतोपरी घराला जपणे, मुलांचे, नातवंडांचे अभिष्ट चिंतणे इ. प्रसंगी स्वत:कडे दुर्लक्ष करून त्यांच्यासाठी धावपळ करणे ह्यातून घरादारावर मायेची पखरण करतात. मोठ्या हुद्यावर गेल्यानंतर पैशांच्या ऊबेमुळे वृद्ध आई वडिलांपासून दुरावणे योग्य नव्हे हे तरुण पिढीला कळले पाहिजे. स्वत:साठी नव्हे तर एकूणच समाजहिताच्या दृष्टीने हा विचार झाला पाहिजे. कुठल्याही आजी-आजोबांच्या अपेक्षा काय असतात? ज्या मुलांना कष्ट करून मायेने मोठे केले, शिक्षण दिले, मार्गी लावले. त्यांच्या मुलांना प्रेमाने जवळ घ्यावे, त्यांना भरवावे,

त्यांचे लाड करावेत, त्यांच्या गोजिरवाण्या बालपणाला सुंदर सुरक्षित करावे व त्यातच आपले वय आजारपण, दु:ख सारे काही विसरावे. स्वाभिमानाने उरलेले आयुष्य घालवताना, तरुण पिढीला हात देताना नातवंडांच्या कुशीत घराचे नंदनवन करावे.

इतक्या माफक अपेक्षा असताना वृद्धांच्या वाटेला उपेक्षा का यावी? थोरांचा आदर करावा, वृद्धांचे जीवन मनापासून प्रेम करून सुखावह करावे. स्वत: आनंदी राहून घरादाराला आनंदी ठेवावे हीच घराची सुखाची गुरुकिल्ली आहे. तरुण पिढी बेजबाबदार निश्चितच नाही. आरोग्य, चांगल्या सवयी याबाबत खूपच जागरूक आहे. त्यांनी फक्त असा विचार मनी बाळगावा की उद्या आम्हीही या स्थितीला जाणार आहोत. चांगले विचार, चांगले आचार कधीही वाया जाऊ शकत नाहीत. उद्याची तरुण पिढी आज त्यांच्या आजी-आजोबांच्या प्रेमळ सहवासात फुलू दे. संस्कारांचे खतपाणी घेऊन वाढू दे. त्यांना ज्ञानाने, संस्काराने मोठे होऊ दे. घरदार, जमीन-जुमला या पेक्षा ही फार मोठी संपत्ती आहे.

पण कुठल्याही नाण्याला दोन बाजू असतात. हेही तितकेच खरे. आजी-आजोबांनीही आजच्या बदललेल्या जीवनशैलीशी जुळवून घेताना आपल्या काळाची सारखी तुलना करू नये. आपले अनुभव विचारल्याशिवाय दुसऱ्यावर लादू नये. तसेच प्रत्येक गोष्टीत सकारात्मक दृष्टीकोन ठेवावा. किरकिरे मूल व किरकिरे वृद्ध यांना कोणीच जवळ करीत नाहीत.

टाळी वाजण्यासाठी दोन्ही हातांची गरज असते हेच खरे!

**- सौ. विद्या र. राजाध्यक्ष,** कोल्हापूर
दूरध्वनी - ०२३१ - २६३८०३२

मित्र - (त्याच्या एका व्यापारी मित्रास)

''त्या चपट्या नाकाच्या अन् लांब कानाच्या इसमास तू अकाउंटंट म्हणून कसं कामावर ठेवलंस?

व्यापारी मित्र - तो काही अफरातफर करून पळाला तर त्याला शोधायला सोपं पडेल म्हणून.

☺ ☺ ☺ ☺ ☺

**- वसंत धुपकर,** पुणे
०२०-२०२५५४०८

## चुकीची दुरुस्ती

'संवाद' सप्टेंबर २०१३ च्या अंकात पान ३-४ वर ३९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे संक्षिप्त वृत्त छापले त्यात पसायदान करणाऱ्या सौ. मनिषा पुरेकर या होत्या. त्यांचे नाव सौ. मनिषा पुणेकर असे अनवधानाने छापले आहे.

या झालेल्या चुकीबद्दल आम्ही दिलगीर आहोत.

- संपादक

## सण पाऊस साजरा

निळ्या निळ्या नभातून
कोसळती शुभ्र धारा
काळ्या काळ्या मातीतून
ओल्या गंधाचा फवारा

हिरव्या हिरव्या कोंबातून
दिमाखात ये फुलोरा
पिवळ्या पिवळ्या फुलांतून
झुले तो सोनपिसारा

अज्ञातशा कुंचल्यातून खेळ
रंगतो हा न्यारा !
सप्तरंगी अफलातून
इंद्रधनूचा नजारा

फुलतो रोमांचातून
मनमोराचा पिसारा
होई चिंब मिठीतून
सण पाऊस साजरा!

**- विजयकुमार व्ही. देशपांडे, सोलापूर**
भ्रमणध्वनी : **९०११६६७१२७**

## *काय राहिले?*

हाकेसरशी तुझ्या मी तुझ्याकडे पाहिले
दिसलीस तू परी, मी तुला न पाहिले
सांगावयाचे होते काही तुला, अन् मलाही
मनात साठलेले, मनातच राहिले

तीन तपाच्या सहजीवनात, मी काय तुला दिले
देऊन सर्व काही, मी काहीच नाही दिले
घेतलेले मात्र तुज सांगावयाचे राहिले
मनात साठलेले, मनातच राहिले

गमे समीप, असशी दूर तरी
जाणीव जागता, अंतरीचे भाव उसळती
आनंदाच्या क्षणी त्या, हाती काय राहिले
मनात साठलेले, मनातच राहिले

**- अरुण तुळजापूरकर**
फोन - ९८९०२२६१५४


OCTOBER - 2013 SAMVAD
State Bank of India
THE BANKER TO EVERY INDIAN
For a range of Instant Services:
Funds Transfer, RTGS / NEFT
Foreign Outward Remittance
Fixed / Recurring Deposit
Tax Payment
Utility Bills Payment
Mobile Top Up
Railway / Air Tickets
And many more...
Log on to:
https://www.onlinesbi.com
Easy, Convenient, Fast & Secure
Visit your branch for Internet Banking registration.
Do not share User ID, Password or One-Time Password with anyone or respond to any email / SMS / phone call which asks for your personal information.
Life banaye aasaan Online SBI
For details visit https://www.onlinesbi.com or Call Toll-Free 1800-425-3800
23

OCTOBER - 2013 SAMVAD

Regd. under RNI No. MAHBIL/2008/25425 & Declaration No. PHM/SR/63/VIII/2008 Dated 12/5/2008
SSPO Pune under Postal Concession register No. PNCW/M-144/2011-2013 Dated 10.12.2010
Permission to Post without Prepayment No.: WPP-217 at Market Yard P.S.O. on 25th of each Month and Published on 25th of the Month



Annual General Meeting
Dt. 27th August 2013
Circle Managing Committee on the Dais

Opening of Amravati Zonal Sub-Centre



सूचना : १) या मासिकांत प्रसिद्ध झालेल्या लेखांतील मतांशी संपादकमंडळ सहमत असेलच असे नाही. तसेच जाहिरातीतील मजकुराची सत्यासत्यता सभासदांनी स्वत: पडताळून घ्यावी. त्याबाबत असोसिएशन वा 'संवाद' चे संपादक मंडळ जबाबदार असणार नाही.

२) असोसिएशनचे कार्यालय, सोमवार ते शुक्रवार, संध्याकाळी ६ ते ७.३० या वेळातच उघडे असते. याची कृपया नोंद घ्यावी.
संपर्क दूरध्वनी क्र. (०२०) २४३३२१४१

**Thane Office Address** : A/5 Swami Siddharth CHS Ltd., S V Road, Naupada, Thane 400 602. Tel. No : 25446837
**Timings** : On Tuesday & Friday between 4 pm to 6 pm.

**Printed Matter**

**If Undelivered Please Return to :**
**STATE BANK OF INDIA PENSIONERS' ASSOCIATION, (MUMBAI CIRCLE), PUNE**
**Anubandh, Building No. B-2, 4th Floor, Block No.16, Near Ramkrishna Math, Sinhagad Road, Pune - 411030. Phone : 24332141**

To,

**Publisher** – Shri. Ramchandra Narayan Lalingkar, Secretary, State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune has printed this magazine in the Printing Press owned by **Printer** – Shri.Chandrashekhar Digambar Joshi, Director, Shree J Printers Pvt.Ltd., at 1416 Sadashiv Peth, Datta Kuti, Pune – 411030 on behalf of **Owner** – State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune, at "Anubandh", Bldg.No.B2, Block No.16,Near Ramkrishna Math, Sinhagad Road, Pune – 411030. **Editor** – Shri. Krantisen Ramchandra Athawale – address as above.